नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर
विदर्भ साहित्य संघ, नागपूर दुर्मिळ ग्रंथ संपदा

या अंकांत

महाभारतांतील तीन निष्ठा —वा. वि. मिराशी
आइन्स्टिन :
जीवनरहस्य आणि जीवनकथा —जनार्दन माधव कायंदे
मराठी व्याकरणांतील वर्णांचीं स्थानें —या. ल. मुळे
ग्रंथसमीक्षण —प्रा. सुरेश म. डोळके
शिवाय ग्रंथसमालोचन, संघवार्ता वगैरे.

वर्ष १२
अंक ५
संपादक :
पां. कृ. सावळापूरकर
आगष्ट १९५७
किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष १२ वें   अंक ५

आगस्ट १९५७

संपादकीय

आत्मकथन

नागपुरांत सध्या सुरू असलेल्या ज्वराच्या साथीची झळ 'युगवाणी' छापला जात असलेल्या छापखान्याच्या बहुसंख्य कामगारांनाहि गेल्या महिन्यांत लागली; ह्यामुळे 'युगवाणी'चा जुलैचा अंक काढावयाला आम्हाला दोन आठवडे उशीर लागला याबद्दल वाचकांनी क्षमा करावी. विशेष अपरिहार्य कारण घडल्याखेरीज आमच्याकडून सेवेंत अंतर पडणार नाही याची निश्चिती बाळगावी.

'युगवाणी'च्या अंकाची पृष्ठमर्यादा गेल्या कांही अंकांपासून थोडी कमी झाली असल्याचें वाचकांच्या निदर्शनास आलेंच असेल. त्यासंबंधी विचारणा करणारीं अनेक पत्रेंहि आमच्याकडे आलीं आहेत म्हणून खुलासा करणें आवश्यक आहे.

'युगवाणी' व्यापारी दृष्टीने कधीच चालवलें जात नाही व विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांस तें मोफत म्हणूनच दिलें जातें. अर्थात् या मासिकासाठी होणाऱ्या खर्चाचा फार मोठा अंश हा मुख्यत: सरकारी अनुदानांतून भागविला जातो. जुन्या मध्यप्रदेश सरकारने विदर्भ साहित्य संघास यथोचित अनुदान देऊन आपली विद्याभिरुचि सिद्ध केली होती. तें अनुदान जसेचें तसें यंदा नव्या सरकारकडून चालू राहतें की नाही हें कांहीच न कळल्यामुळे विदर्भ साहित्य संघाच्या कारभारांत सर्वत्र काटकसरीचें किंबहुना उपासमारीचेंहि धोरण अवलंबणें अपरिहार्य होऊन बसलें आहे. त्याचाच परिणाम 'युगवाणी' वरहि झाला आहे. अनुदान आलें तर आम्ही पुन: पल्लवित होऊं हें सांगणें नकोच; पण तें न आलें तर आहे याहि स्वरूपांत आम्हाला 'युगवाणी'चें अस्तित्व टिकवितां येईल की नाही याचा संशय आहे. आमचा सरकारवर विश्वास आहे म्हणून आम्ही कोणत्याहि अशुभाचें चिंतन करून ठेवीत नाही. तथापि पुढील आशेवर अवलंबून राहून आज कर्जबाजारी होण्याचें धोरण कोणत्याहि सार्वजनिक संस्थेस हितावह नाही हेंहि तितकेंच खरें आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाभारतांतील तीन निष्ठा

वा. वि. मिराशी

महाभारत हा भारतीय संस्कृतीचा ज्ञानकोश आहे. या ग्रंथाच्या आदिपर्वात म्हटलें आहे —

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।।

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार 'पुरुषार्थ' म्हणजे मानवी जीवनाचे उद्देश आपल्या संस्कृतींत गणले आहेत. या पुरुषार्थांच्या प्राप्तीकरितां मनुष्य प्रयत्न करीत असतां त्याच्या पुढे जे विविध प्रश्न उपस्थित होतात त्यांची चर्चा महाभारतांतील कोणत्या ना कोणत्या पर्वांत केलेली आपणांस आढळेल. त्यामुळे या पुरुषार्थांविषयीं जें महाभारतांत म्हटलें आहे तेंच इतर प्राचीन ग्रंथांत आढळेल, जें त्यांत चर्चिलें नाही तें इतरत्र आढळणार नाही' असें वरील श्लोकांत म्हटलें आहे, त्यांत फारशी अतिशयोक्ति नाही. प्रस्तुत लेखांत या सर्वांत महत्त्वाचा जो चौथा पुरुषार्थ मोक्ष त्या संबंधी महाभारतकारांचें काय सांगणें आहे याचा थोडक्यांत विचार करूं.

आपल्या धर्माप्रमाणें मानवी जीवनाचें मुख्य ध्येय मोक्ष हें आहे. सर्व भारतीय धर्मांत पुनर्जन्माचा सिद्धांत मान्य केला आहे. जीव चौऱ्याऐंशी लक्ष योनींतून जात जात पुण्य कर्माच्या योगें कधीकाळीं मनुष्यजन्म घेतो. त्या जन्मांतच त्याला ज्ञानप्राप्ति करून घेऊन मोक्ष किंवा जन्ममरणाच्या चक्रांतून सुटका करून घेतां येते. या ज्ञानप्राप्तीच्या साधनाविषयी व स्वरूपाविषयी भारतीय धर्मांत व दर्शनांत मतभेद आहेत, पण 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' या विषयी कोणाचाहि विवाद नाही.

हें ज्ञान प्राप्त करून घेण्याचे दोन मुख्य मार्ग अनादि कालापासून आपल्या देशांत मान्य झाले आहेत. ते प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग या नांवाने ओळखले जातात. आपल्या प्राचीन इतिहासांत कधी पहिला तर कधी दुसरा मार्ग प्रबळ झालेला आढळेल. उदाहरणार्थ, संहिताकालांत सामान्यतः प्रवृत्तिमार्गाचा सर्वत्र प्रचार होता. अश्विनीकुमारांना उद्देशून ऋग्वेदांत म्हटलें आहे—

पिवतं च तृप्णुतं चा च गच्छतं
प्रजां च धत्तं द्रविणं च धत्तम् ।

हतं च शत्रून् यततं च मित्रिणः
प्रजां च धत्तं द्रविणं च धत्तम् ।

ब्रह्म जिन्वतमुत जिन्वतं धियो
हतं रक्षांसि सेधतममीवाः ।

क्षत्रं जिन्वतमुत जिन्वतं नॄन्
हतं रक्षांसि सेधतममीवाः ।

धेनूर्जिन्वतमुत जिन्वतं विशो
हतं रक्षांसि सेधतमवीवाः ।।

(हे अश्विहो ! तुम्ही सोम प्या व तृप्त व्हा. पुढे व्हा. आम्हाला प्रजा व धन द्या. आमच्या शत्रूंचा नाश करा, मित्रांचें रक्षण करा. ज्ञात्यांना प्रोत्साहन द्या, सद्बुद्धि वाढवा. दुष्टांचा नाश करा, रोगांना पिटाळून लावा. क्षात्रतेज वाढवा, लोकांत उत्साह उत्पन्न करा, गोधनाची वृद्धि करा, लोकांना प्रसन्न करा.)

या प्रकारच्या देवांच्या प्रार्थना ऋग्वेदांत सर्वत्र आढळतात. वैदिक आर्यांना आपण शंभर वर्षें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जगावें (जीवेम शरदः शतम्।), आपलें जीवन निरोगी व सुसमृद्ध असावें, आपण आपल्या शत्रूंवर सदैव विजय मिळवावा, आपण सदैव ज्ञानसंपन्न व आनंदी असावें, आपल्या धनधान्याची सदैव वृद्धि व्हावी, आपणांस पुत्रपौत्र होऊन कुटुंबसौख्य प्राप्त व्हावें अशी इच्छा असे. या गोष्टी देवदेवतांच्या कृपेनें प्राप्त होतात अशी त्यांची श्रद्धा असल्यानें ते त्यांस संतुष्ट करण्याकरितां यज्ञ करीत. यज्ञानुष्ठानाने ऐहिक समृद्धि तर प्राप्त होतेच पण त्याशिवाय मृत्यूनंतर स्वर्गप्राप्तिहि होते असा त्यांचा विश्वास होता. वैदिक आर्य जयिष्णु, वर्धिष्णु वृत्तीचे होते. त्यांनी लौकरच येथील आदिवासी लोकांस जिंकून आपले दास बनविलें आणि आपल्या धर्माचा व संस्कृतीचा प्रसार केला. मनुष्यानें सदैव उत्साही व कर्मशील असावें, श्रमाशिवाय संपत्ति मिळत नाही, आळशी मनुष्य पापी असतो. इंद्र हा कर्मशील मनुष्याचा मित्र असतो असें ते समजत (नानाश्रान्ताय श्रीरस्ति। पापो नृषद्वरो जनः इन्द्र इच्चरतः सखा॥) या प्रमाणे वेदसंहिताकालांत सर्वत्र प्रवृत्तिमार्गच प्रचलित होता.

यानंतरच्या उपनिषत्काळांत आर्यांची दृष्टि अन्तर्मुख झाली. त्यांना ऐहिक सुखांची नश्वरता पटूं लागली. विषयोपभोगानें मनुष्याची तृप्ति कधीहि होत नाही, उलट सुखोपभोगाची इच्छा जास्त जास्त वाढत जाते. विषयोपभोगांच्या अभिलाषानें राग, द्वेष, लोभ, मोह इत्यादि मनोविकार उत्पन्न होऊन मनुष्याचा अधःपात होऊं लागतो. यज्ञयागादिकांमुळे स्वर्ग मिळतो म्हणावा तर तोहि अनित्य असतो. (तद्यथेह कर्मजितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यजितो लोकः क्षीयेत।) तेव्हा सर्व ऐहिक व पारलौकिक सुखें नश्वर होत. ऐहिक समृद्धीनें अमर होण्याची आशा नाही (अमृतत्वस्य तु नाशास्ति वित्तेन।). आत्मज्ञानानेंच मोक्ष मिळवितां येणें शक्य आहे. त्यापुढे सर्व गोष्टी तुच्छ मानून विद्वान् लोक पुत्रैषणा, वित्तैषणा व लोकैषणा यांचा त्याग करून संन्यासमार्गाचा अवलंब करूं लागले (एतमेव प्रव्राजिनो लोकमिच्छन्तः प्रव्रजन्ति। एतद्ध स्म वै तत्पूर्वे विद्वांसः प्रजां न कामयन्ते किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्माऽयं लोक इति ते ह स्म पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति।). अशा रीतीनें निवृत्तिमार्ग उपनिषत्कालांत पुढे आला. त्याचाच परिणाम पुढे बौद्ध व जैन धर्मांच्या रूपानें दिसूं लागला.

महाभारतांत या दोन्ही मार्गांचें वर्णन आलें आहे. भारतीय युद्धांत आपले असंख्य स्वजन मारले गेले हें पाहून विषण्ण झालेल्या युधिष्ठिराला अर्जुन म्हणतो—

एतावानेव वेदेषु निश्चयः कविभिः कृतः।
अध्येतव्या त्रयी नित्यं भवितव्यं विपश्चिता।
सर्वथा धनमाहार्यं यष्टव्यं चापि यत्नतः।
शाश्वतोऽयं भूतिपथो नास्यान्तमनुशुश्रुम॥

(ऋग्वेदादि तीन वेदांचें अध्ययन करावें, विद्वान् व्हावें, सर्व उपायांनी धन मिळवावें, प्रयत्नें करून यज्ञ करावे. हाच शाश्वत अभ्युदयाचा मार्ग वेदवेत्त्या ऋषींना निश्चित केला आहे.)

संन्यास मार्गाचा अवलंब केला असतां समाजाची घडी विसकटून जाते, कुटुंबसंस्था नामशेष होते व जगाचा विनाश अटळ होतो हें दाखविण्याकरितां अर्जुनानें खालील इंद्रतापससंवाद सांगितला—

अत्रैवोदाहरन्तीममितिहासं पुरातनम्।
तापसैः सह संवादं शक्रस्य भरतर्षभ॥
केचिद् गृहान् परित्यज्य वनमभ्यागमन् द्विजाः।
अजातश्मश्रवो मन्दाः कुले जाताः प्रवव्रजुः॥
तानावभाषे भगवान् पक्षी भूत्वा हिरण्मयः।
सुदुष्करं मनुष्यैश्च यत्कृतं विघसाशिभिः॥

(एकदा कुलीन व ज्यांना श्मश्रु फुटलेली नाही असे कोवळ्या वयाचे द्विज संसाराचा त्याग करून व असें करणें हाच धर्म आहे असें समजून संन्यास घेते झाले. हें त्यांचें कृत्य समाजधारणेस घातक आहे असें जाणून इंद्रानें सुवर्ण पक्ष्याचें रूप धारण करून त्यांस म्हटलें—संन्यास घेण्यापेक्षां विघसाशी होणें हें जास्त कठीण आहे.) हे विघसाशी कोण हें स्पष्ट करण्याकरिता तो पक्षी म्हणतो—

सायंप्रातर्विभज्यान्नं स्वकुटुम्बे यथाविधि।
दत्वातिथिभ्यो देवेभ्यः पितृभ्यः स्वजनाय च।
अवशिष्टानि येऽश्नन्ति तानाहुर्विघसाशिनः।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(सकाळ संध्याकाळ आपल्या कुटुंबांत अन्न तयार करून व यथाविधि देव, पितर व अतिथि यांस व आपल्या संबंधीयांस देऊन राहिलेलें जे सेवन करतात ते विघसाशी होत.) असे लोक इन्द्राच्या स्वर्गात जाऊन शाश्वत काळ राहतात असें पुढे त्या पक्ष्यानें म्हटलें आहे.

याच्या उलट निवृत्तिमार्गाचेंहि वर्णन महाभारतांत कांही ठिकाणीं केलें आहे—

निवृत्तिलक्षणस्त्वन्यो धर्मो मोक्षाय तिष्ठति ।
सर्वभूतदया धर्मो न चैकग्रामवासिता ॥
आशापाशविमोक्षश्च शस्यते मोक्षकांक्षिणाम् ।
न कुटयां नोदके संगो न वाससि न चासने ॥
न त्रिदण्डे न शयने नाग्नौ न शरणालये ।
अध्यात्मगतिचित्तो यस्तन्मनास्तत्परायणः ।
आत्मन्येवात्मनो भावं समासज्जेत वै द्विजः ॥
एव मोक्षविदां धर्मो वेदोक्तः सत्पथः सताम् ॥

यांमध्ये निवृत्तिमार्गाचें किंवा संन्यासधर्माचें वर्णन आहे. संन्याशानें एकाच गावांत राहूं नये. पर्णकुटी, उदक, वस्त्र, आसन, त्रिदण्ड, बिछाना, अग्नि, यासारख्या कोणत्याहि वस्तूचा लोभ धरूं नये, आशापाशांतून स्वतःची सुटका करून घ्यावी, प्राणिमात्रांवर दया करावी, आत्मचिंतनांत सदैव मन एकाग्र करावें, दुसऱ्या कशाकडेहि लक्ष देऊं नये असें यांत म्हटलें आहे.

या निवृत्तिमार्गाचा प्रसार पुष्कळ काळ भारतांत झाला होता. बौद्ध व जैन धर्मांतहि याच मार्गावर विशेष जोर दिला आहे. श्रीशंकराचार्यांनीहि याच मार्गाचा पुरस्कार केला व बौद्ध धर्माचा पाडाव केला. पण हा मार्ग वैयक्तिक हिताचा आहे. सर्वसंगपरित्याग करून व अरण्यांत जाऊन केवळ आत्मानात्मविचारांत निमग्न झालेला मनुष्य स्वतःचें ध्येय मोक्ष साध्य करून घेईल, पण त्यानें समाजाचा फायदा होणार नाही. शिवाय हा मार्ग सर्वांस साध्य होणारा नाही. सर्वसंगपरित्याग करतों असें म्हणणें सोपें आहे, पण तदनुसार खरोखर कृति होणें अत्यंत कठीण आहे. तृष्णानाश झाला नसतां केवळ काषायवस्त्रें धारण करून, डोक्याचें मुंडन करून व दण्डकमण्डलु घेऊन मोक्षप्राप्ति होणें शक्य नाही. महाभारतांत म्हटलें आहे—

काषायधारणं मौण्ड्यं त्रिविष्टब्धं कमण्डलुम्।
लिङ्गान्युत्पथ भूतानि न मोक्षायेति मे मतिः ॥

बुद्धानें संन्याशांचा संघ काढला, त्यांच्या आचरणाकरितां नियमहि घालून दिले, पण त्याला भिक्षूंमधील भांडणें टाळतां आलीं नाहीत. अलीकडच्या काळांत शंकराचार्यांच्या फिर्यादी न्यायालयांत गेलेल्या लोकांस माहीत आहेत. संघ किंवा मठ स्थापले व त्यांत अनेक भिक्षु किंवा संन्यासी एकत्र राहूं लागले की त्यांच्यामध्ये आधिपत्याबद्दल किंवा श्रेष्ठकनिष्ठत्वाबद्दल कलह सुरू होतात. मग ते व सामान्य जनांतील अधिकारी यांमध्ये भेद कसला ? आणि ते मुक्त तरी कसे होणार ? सुलभा–जनक संवादांत राजर्षि जनक म्हणतो—

आधिपत्ये तथा तुल्ये निग्रहानुग्रहात्मके ।
राजभिर्भिक्षुकास्तुल्या मुच्यन्ते केन हेतुना ॥

तेव्हा केवळ संन्यास घेतल्यानें मोक्ष मिळत नाही. मोक्ष ज्ञानानें मिळतो व तें ज्ञान संसारांत राहूनहि मिळवितां येतें, गृहस्थाश्रमांत राहूनहि मोक्ष कसा मिळवितां येतो हें युधिष्ठिरानें विचारलें असतां भीष्मांनी सुलभा–जनक–संवाद सांगितला. सुलभा नामक संन्यासिनी जनकाकडे गेली असतां जनकानें तिला मोक्षप्राप्तीच्या तीन निष्ठा किंवा मार्ग सांगितले—

ज्ञाननिष्ठां वदन्त्ये मोक्षशास्त्रविदो जनाः ।
कर्मनिष्ठां तथैवान्ये यतयः सूक्ष्मदर्शिनः ॥
प्रहायोभयमप्येव ज्ञानं कर्म च केवलम् ।
तृतीयेयं समाख्याता निष्ठा तेन महात्मना ॥

केवळ ज्ञानमार्ग किंवा केवळ कर्ममार्ग यांखेरीज ज्ञान व कर्म यांचा समन्वय करणारा असा तिसराहि एक मार्ग आपणांस आपला गुरु पंचशिख याच्याकडून कळला असें जनकानें म्हटलें आहे. या मार्गाचें विशिष्ट नांव जनकानें दिलें नाही. पण तो श्रीमद्भगवद्गीतेंतील निष्कामकर्मयोगाहून भिन्न नाही.

या मार्गांत गृहस्थाश्रमाचा त्याग केला पाहिजे असा नियम नाही. गृहस्थाश्रमांत राहून न्यायानें धनार्जन करण्यास हरकत नाही. कारण—

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आकिञ्चन्ये न मोक्षोऽस्ति किञ्चन्ये नास्ति वन्धनम् ।
किञ्चन्ये चेतरे चैव जन्तुर्ज्ञानेन मुच्यते ॥

केवळ मनुष्य दरिद्री आहे म्हणून त्याला मोक्ष मिळत नाही, किंवा तो सर्वस्वी अर्थहीन नाही म्हणून वद्ध होत नाही. ज्ञान हेंच मोक्षाचें साधन आहे, तें दारिद्र्यांतच प्राप्त होतें असें नाही. पराशरगीतेंत म्हटलें आहे—

न्यायागतं धनं चैव न्यायेनैव विवर्धितम् ।
संरक्ष्यं यत्नमास्थाय धर्मार्थमिति निश्चयः ॥

न धर्मार्थी नृशंसेन कर्मणा धनमर्जयेत् ।
शक्तितः सर्वकार्याणि कुर्यान्नर्द्धिमनुस्मरेत् ॥

न्यायाने पैसा मिळवावा, न्यायाने त्याची वृद्धि करावी व त्याचें संरक्षण करून धर्मार्थ म्हणजे परोपकारार्थ त्याचा व्यय करावा. धर्माकरिताहि दुष्ट उपायाने अर्थार्जन करूं नये. यथाशक्ति आपलीं सर्व कर्तव्यें पार पाडावींत. तीं करतांना स्वतःच्या श्रीमंतीचा अभिमान असूं नये.

जनक राजा मोठ्या राज्याचा अधिपति होता, पण त्याला त्याचा मुळीच लोभ नव्हता. 'मिथिलायां प्रदग्धायां न मे दह्यति किञ्चन' असें तो म्हणत असे. त्याची सुखदुःखाविषयी निस्पृहता इतकी की, तो म्हणतो—

यश्च मे दक्षिणं बाहुं चन्दनेन समुक्षयेत् ।
सव्यं वास्यापि यस्तक्षेत्समावेतावुभौ मम ॥

जो माझ्या उजव्या हाताला चन्दनाचा लेप करील आणि जो माझ्या डाव्या हाताला वासल्याने तोडील ते दोन्हीहि मला सारखेच आहेत.

तुलाधार–जाजलि संवादांत तुलाधार नामक वाणी जाजलि नामक महातपस्व्याला म्हणतो—

वेदाहं जाजले धर्मं सरहस्यं सनातनम् ।
सर्वभूतहितं मैत्रं पुराणं यं जना विदुः ॥

नानुरुद्धये विरुद्धये वा न द्वेष्मि न च कामये ।
समोऽहं सर्वभूतेषु पश्य मे जाजले व्रतम् ॥

तुला मे सर्वभूतेषु समा तिष्ठति जाजले ।
नाहं परेषां कृत्यानि प्रशंसामि न गर्हये ॥

तुलाधार म्हणतो, 'सर्व प्राण्यांच्या हिताकरितां प्रयत्न करणें व त्यांच्याशीं मैत्रीभाव ठेवणें हें धर्माचें सनातन रहस्य आहे. माझी तुला जशी सर्वांच्या बाबतींत सारखेंच वजन दाखविते त्याप्रमाणे मीहि सर्वांशीं साम्यभावाने वागतों. मी कोणाची प्रशंसा किंवा निंदा करीत नाही.

लोकव्यवहारांत कसें वागावें याविषयी भीष्मांनी अनुशासनपर्वांत उत्तम उपदेश केला आहे—

प्राणातिपातः स्तैन्यं च परदारानथापि च ।
त्रीणि पापानि कायेन सर्वतः परिवर्जयेत् ॥
असत्प्रलापं पारुष्यं पैशुन्यमनृतं तथा ।
चत्वारि वाचा राजेन्द्र न जल्पेन्नानुचिन्तयेत् ॥
अनभिध्या परस्वेषु परसत्त्वेषु सौहृदम् ।
कर्मणां फलमस्तीति त्रिविधं मनसा चरेत् ॥

यामध्ये काया, वाचा आणि मन यांचीं दशविध पापें टाळण्याचा उपदेश केला आहे. हिंसा, चोरी, जारकर्म हीं कायिक पापें, कुटाळकी, टोचून बोलणें, चहाडी करणें व खोटें बोलणें ही वाचिक पापें, परद्रव्याचा अभिलाष, दुसऱ्याचें अनिष्टचिन्तन व नास्तिकपणा हीं मानसिक पापें–अशीं दहा पापें सर्वदा वर्ज्य मानावीं.

सध्याच्या काळीं या उपदेशाचें अत्यंत महत्त्व आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपलें नैतिक अवमूल्यन झपाट्याने होत आहे असें विचारी लोकांचें मत झालें आहे. सध्या सर्वत्र काळाबाजार, पक्षपात, परस्वापहार,

'श्री गुरुदेव'

मानवसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीस वाहिलेलें मासिक

श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज, मोझरी

हिंदी-मराठी विभागात्मक वा. मूल्य रु. ५ | हिंदी विभागात्मक वा. मूल्य रु. ३

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

द्वेष, हिंसा इत्यादि दुर्गुण थैमान घालत आहेत. लोभीपणाचा कळस झाला आहे. सत्य, शुचिता, दया, दान इत्यादि सद्गुणांना किंमत उरली नाही. हीच परिस्थिति चालू राहिली तर आपल्या राष्ट्राचा विनाश अटळ होईल. कोणत्याहि राष्ट्राचा अभ्युदय त्यांतील लोकांच्या आचारविचारांच्या शुद्धतेवर अवलंबून असतो. तेव्हा या परिस्थितींत आपण आपल्या प्राचीन धर्मग्रंथांचें परिशीलन करून त्यांत उपदेशिलेलीं उदात्त तत्त्वें आचरणांत आणलीं पाहिजेत. बदललेल्या परिस्थितींत प्राचीन काळची कर्मनिष्ठा व ज्ञाननिष्ठा त्याच स्वरूपांत आपल्या निःश्रेयससिद्धीकरितां उपयोगी पडणार नाहीत. संन्यासनिष्ठेला परहितरतत्वाची किंवा जनसेवेची जोड दिली पाहिजे. आधुनिक काळांत भारतांत स्थापिलेल्या कांही धार्मिक संस्थांच्या सदस्यांनी याची सदैव जाणीव ठेवली आहे. आणि धार्मिक शिक्षणाप्रमाणे इतरहि विविध उपायांनी जनसेवा चालविली आहे. त्यांच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी जनतेनेहि सहकार्य केलें पाहिजे. यज्ञयागादिकांनी मोक्ष मिळेल असें आता बहुधा कोणी मानीत नाही, पण इंद्रियनिग्रह, सदाचार, सत्य, दया, दान, स्वकर्तव्याचरण, इत्यादिकांचें महत्त्व अबाधित आहे. अशा सद्गुणांचें आचरण केल्यास अंगीं वैराग्य बाणतें व त्याचें पर्यवसान ज्ञानांत होऊन त्यायोगें आपलें निःश्रेयस साध्य करतां येतें. जनकाने म्हटलें आहे—

वैराग्यं पुनरेतस्य मोक्षस्य परमो विधिः ।

तेव्हा महाभारतांत उपदेशिलेल्या या तिसऱ्या निष्ठेकडे वाचकांचें लक्ष वळवून हा लांबलेला लेख पुरा करतों.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल (निवडक मौलिक निबंधांचा संग्रह) रु. २–४–०
२. सुमन संचय (कविता संग्रह) रु. १–४–०
३. मराठी गद्य (मराठी साहित्यांतील निवडक वेचे) रु. १–८–०
४. अंमलदार (नाटक) लेखक–श्री. पु. ल. देशपांडे रु. २–०–०
५. भारती (नाटक) लेखक–श्री. नाना जोग रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन —डॉ. मा. गो. देशमुख रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी —श्री. द. रा. गोमकाळे रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार–कविभूषण अण्णासाहेब खापर्डे रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत —प्रा. श्री. मा. कुळकर्णी रु. ०–८–०
५. सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल —श्री. द. वि. तेंडुलकर (प्रफुल्लदत्त) रु. ०–८–०
६. गडकऱ्यांची खरी भूमिका —प्रा. भ. श्री. पंडित रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आइन्स्टिन जीवनरहस्य आणि जीवनकथा

जनार्दन माधव कायंदे

१. कीर्तिरूपें उरावें

श्रीसमर्थ रामदास–स्वामींचें "मरावें परी कीर्तिरूपें उरावें" हें वचन अनेक महात्म्यांच्या बाबतींत मेल्यानंतर खरें ठरलें आहे. परंतु मेल्यानंतर आपली कीर्ति कोणत्या प्रकारें उरणार आहे, हें जिवंतपणीं प्रत्यक्ष पाहण्याचें भाग्य जगाच्या इतिहासांत, फक्त एकाच ऋषितुल्य पुरुषाला लाभलें. आणि हा ऋषि सर्व सुविद्य जगाचा परिचित अल्बर्ट आइन्स्टीन होय. अनेक महात्म्यांच्या अस्थींवर मंदिरें उभारण्यांत आलेलीं आहेत. पण आपल्या जिवंतपणींच अमुक प्रकारचें मंदिर आपल्या स्मरणार्थ निर्माण झालें आहे हें पाहणारे महात्मे दुर्मिळच. हें भाग्य आइन्स्टिनला लाभलें. त्याच्या उभ्या आयुष्यांत जो त्याला सन्मान मिळाला, अनेक विद्यापीठांनी त्याला पदव्या देऊन विभूषित केलें किंवा अनेक राष्ट्रांतून त्याच्या सन्मानार्थ सुटीचे दिवस ठेवलेत त्या सगळ्यांपेक्षाहि त्याचें नांव चिरंतन राहील, त्याच्या कीर्तीचा अजरामर लेख राहील, अशी एक घटना न्यूयॉर्क शहरांत घडून आली. हडसन नदीच्या किनाऱ्यावर एक गगनचुंबी धर्ममंदिर बांधण्यांत आलें आहे. या धर्ममंदिराचें सौन्दर्य अप्रतिम आहे. परमेश्वरपूजनाच्या बाबतींत माणूस कलेची, सौन्दर्याची, श्रद्धेची किती कमाल मर्यादा गाठूं शकतो याचें निदर्शक हें मंदिर आहे. हें धर्ममंदिर चर्च आहे. या मंदिरांत कुणीहि यावें, कुणीहि प्रार्थना करावी, असें स्वातंत्र्य आहे. आणि या गोष्टीची साक्ष मंदिराचें अंतरंग आणि बहिरंग देत आहे. या धर्ममंदिराचें नांव 'रिव्हरसाइड चर्च' असें आहे. दारावर शिरतांनाच मध्यभागीं येशू ख्रिस्ताची मूर्ति आहे. ख्रिश्चन धर्ममंडळींनी हें धर्ममंदिर बांधलें असल्याने सहजच ख्रिस्तमूर्ति त्या ठिकाणीं असणें अपरिहार्य दिसतें, आणि आज जगाच्या पाठीवर ख्रिस्ताचा दिसणारा प्रभावहि स्पष्ट दिसतो. ह्या ख्रिस्तमूर्तीच्या पायाशीं अल्बर्ट आइन्स्टीनची मूर्ति कोरलेली आहे. आजूबाजूला अनेक जुन्या ऋषि लोकांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. या धर्ममंदिरांत विश्वकीर्ति मिळविलेल्या डेव्हिड, सालोमन, क्लोव्हिम्, कॉन्स्टन्टाइन्, मार्कस् अरेलियम्, शार्लमन् व आल्फ्रेड या सात राजे लोकांच्या मूर्ति कोरण्याचें जेव्हा ठरलें, तेव्हा त्यांच्या सोबतीला आइन्स्टिनचें नांव असावें असें सुचविण्यांत आलें होतें. आइन्स्टिनच्या मोठेपणाबद्दल, बुद्धिमत्तेबद्दल किंवा त्याने केलेल्या अविष्कारांबद्दल कुणालाहि शंका नव्हती. तो सर्वतोपरी लोकमान्य आणि राजमान्य होता. तरीहि त्याची मूर्ति तिथे कोरण्याबद्दल वादळ उत्पन्न झालें. ख्रिश्चन लोकांचें म्हणणें असें की आइन्स्टिनचा परमेश्वरावर विश्वास नाही. ज्यू लोकांचें म्हणणें असें की तो आमचा आहे म्हणून ख्रिस्ती धर्ममन्दिरावर त्याची मूर्ति नसावी. या धर्ममंदिरांत सुमारें सहाशे लोकांचीं नांवेंहि कोरण्यांत आलेलीं आहेत. धर्मगुरु, तत्त्ववेत्ते, आणि शास्त्रज्ञ अशी त्यांची वर्गवारी करून निरनिराळ्या विभागांत सन्मानाने योग्यतेप्रमाणें त्यांचीं नांवें लिहिण्याचें ठरलें पण आइन्स्टिनच्या नांवाबद्दल कांही केल्या एकमत होईना. आइन्स्टिनच्या आविष्कारामुळे जगाचें निश्चित कल्याण झालें असें अजून ठरलें नाही, असें म्हणण्यापर्यन्त कांही प्रतिष्ठित लोकांची मजल गेली; व मोठाच पेचप्रसंग उत्पन्न झाला.

तेव्हा धर्ममंदिराच्या विश्वस्ताने एक युक्ति केली. अमेरिकेंतील नांवाजलेल्या वीस शास्त्रज्ञांना पत्रें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिण्यांत आलीं. प्रत्येकाला अशी विनंती केली की जगांतल्या मोठ्यांतील मोठ्या चौदा शास्त्रज्ञांचीं नांवें लिहून कळविण्याची कृपा करावी. कुणाकुणाला पत्रें गेलींत ही गोष्ट एकमेकांना माहीत नव्हती. प्रत्येकाच्या मतें हीं चौदाहि माणसें जगांतील अत्यंत श्रेष्ठ अशीं हवींत. त्यांचीं नांवें या धर्ममंदिरांत कोरण्यांत येतील असें मात्र सांगण्यांत आलें होतें. प्रत्येकाचीं उत्तरें आलीं; आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट अशी की प्रत्येयाच्या यादींत अल्बर्ट आइन्स्टिनचें नांव होतें. अशा प्रकारें या प्रश्नाचा निकाल मोठ्या सन्मानाने लागला. अशा प्रकारें या भाग्यवान पुरुषाची कीर्ति त्या धर्ममंदिरांत कोरून अजरामर करण्यांत आली. आइन्स्टिन सदासर्वदा आपल्याच विचारांत दंग राहण्याच्या वृत्तीचा. भावनाप्रधान पण भावनेच्या लाटेंत कधी वाहून न जाणारा. बहुधा भावनेच्या पूरप्रसंगीं स्तब्ध राहणारा. अशा प्रकारें मूक राहण्याचे अनेक प्रसंग त्याच्या जीवनांत आले. त्यांतलाच हाहि एक प्रसंग. मंदिराच्या उद्घाटनप्रसंगीं मंदिराच्या दोन सन्माननीय विश्वस्तांनी महाद्वारांतच आइन्स्टीनचें स्वागत केलें. सबंध मंदिर दाखवून सुयोग्य जागीं कोरलेली त्याची प्रतिमूर्तिहि त्यास दाखविण्यांत आली. अर्थातच भावनेचा पूर लोटण्याचा हा प्रसंग. आइन्स्टिन स्तब्धपणे आणि बऱ्याच वेळपर्यंत नुसताच टकमक बघत राहिला. मंदिराची भव्यता आणि त्या प्रसंगाची दिव्यता ह्यांच्या दरम्यान आपल्या कीर्तीचा कळस आपल्या चर्मचक्षूंनी पाहणारा हा एकटाच अलौकिक पुरुष होता. बाकीचे सर्व दिवंगत झालेले! हळूच त्याला मंदिरप्रवेश करण्यास सुचविण्यांत आलें; आणि ही स्वारी आंतील सौंदर्याचें निरीक्षण करीत सुप्रसिद्ध आणि अजरामर कीर्ति मिळविलेल्या लोकांचे जीवनपट वाचीत पावलें टाकीत होती. इमान्युअल कॉन्टची प्रतिमूर्ति दिसली, तेव्हा हे चित्रासारखे तेथे स्थिरावले. सबंध जगाच्या इतिहासांतील अजरामर कीर्ति मिळविलेल्या महापुरुषांचा तो कोरलेला चित्रपट होता. कुणाकुणाचीं नांवें सांगावीं? इथे मोझेस्, तिथे विलमेन्ट मॅरट, एकीकडे बीथोवन्, दुसरीकडे टिंडेन, जॉन बनियन्, मिल्टन इत्यादि इत्यादि. किती नांवें सांगावीं. सहाशे महापुरुष! अनन्त कल्पनांनी, अनन्त विचारांनी जगाचें अनन्त कल्याण करणारे महापुरुष! ह्या सर्व दिव्य पुरुषांचें तें महादिव्य सम्मेलन; आणि या सगळ्या संमेलनांतील महामेरुमणी जिवंत असलेला हा एकटाच भाग्यवान् महापुरुष. स्वर्गीय देवदेवतांनी आकाशांतून पुष्पवृष्टि करावी असा हा सुप्रसंग! आइन्स्टिन आपल्या तंद्रींतून जागा झाला आणि विश्वस्तांना म्हणाला, "काय हो, मी एकटाच जिवंत आहे कां?" विश्वस्त म्हणाले, "होय! हें सत्य आहे." आणि तेथे दिव्य गंभीरतेचें साम्राज्य पसरलें.

२. पण कीर्तीच्याहि पलिकडे

जगांतील असंख्य कीर्तिमान लोकांपैकी रिव्हरसाइड चर्चच्या उद्घाटन प्रसंगीं आइन्स्टिन हे एकटेच जिवंत होते, ही गोष्ट मागील प्रकरणांत सांगण्यांत आली आहे. वास्तविक कीर्तिरूपाने उरलेल्या गुणवान लोकांत कीर्तीच्याहि पलीकडच्या वृत्तींत वावरणारे आइन्स्टिन हे एकटेच ऋषी होते. कीर्ति मिळावी म्हणून आइन्स्टिनने कोणतीच हालचाल केली नाही. पण त्याची महनीयता कीर्तीला त्याच्या पायाशीं लोळण घ्यायला लावत असे. तिच्याकडे त्याचें कधीच लक्ष गेलें नाही. एका महाभागाने एकदा त्यांचें लक्ष तिच्याकडे वेधलें. ते म्हणाले, "काय हो महर्षी, ही कीर्ति आपल्या पायाशीं लोळण कां घेते?" तेव्हा आइन्स्टिन उत्तरले, "अहो, मलाहि हा प्रश्नच आहे."

असा हा महापुरुष सदासर्वदा विचारतंद्रींत असे. त्याच्या एकंदर जीवनाचा आढावा घेऊन अनेकांनी चिकित्सा करून पाहिली. कां कीर्ति यांच्या मागे धावली? यांच्यापूर्वी काय कुणी शोध लावले नाहीत? काय राज्यें मिळविलीं नाहीत? की ग्रंथ लिहिले नाहीत? काय होतें असें? कुणाचेंहि मोठेंपण म्हटले की आजकाल आइन्स्टिनच्या नांवाचें मोजमाप लावण्यांत येतें. **आकाशाची विशालता, पृथ्वीची विपुलता, ग्रहगोलांची भव्यता, प्रकाशाची गतिमानता या सर्वांचें मोजमाप करतांना आइन्स्टिनचा मानदंड लावण्यांत येतो.** कां बरें हें असें घडत असेल? आइ-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

न्स्टिनचें, तत्त्वदर्शन जगाला अजून झालें नाही. त्या तत्त्वदर्शनाचे परिणाम किंचित् किंचित् लक्षांत येत आहेत. जगाला त्या तत्त्वदर्शनाचा तूर्त कांही उपयोग नाही असें तेही म्हणाले. तरीपण त्याचें दर्शन झाल्यावर मेघांचा गडगडाट व्हावा तद्वत् स्वागतनाद उठतो. विद्युल्लतेची दीप्ती झाल्याप्रमाणे अनुभूति येते. त्यांना पाहिल्याबरोबर जनसागर हेलावतो आणि क्षणभर स्थिरावतो; सहज समाधी पावतो. असा त्यांच्या कीर्तीचा प्रभाव आहे. कां बरें हें असें घडत असेल ? सामान्य माणसाला इतकेंच माहीत आहे की ते रिलेटिव्हिटी थिअरीचे (Theory of Relativity : सापेक्षतावाद) जनक आहेत. त्याच सामान्य लोकांना असें विचारलें की प्रो. प्लॅन्क, रेमन्, मिकोव्हिस्की हे कोण बरें? लोक म्हणतील, नांव ऐकल्यासारखें वाटत नाही. वास्तविक या मंडळीच्या आविष्कारामुळे देखील वैज्ञानिक युगांत अनेक क्रान्तिकारक घडामोडी झाल्या आहेत. पण आइन्स्टिन तेवढा सगळ्यांना माहित आहे. त्यांनी काय केलें हें कुणालाहि सांगतां येत नाही. पण ते महान्, भव्य आणि दिव्य आहेत, याबद्दल कुणाच्याहि अन्तःकरणांत शंका नाही. वयाच्या चौतिसाव्या वर्षी त्यांनी आपलें तत्त्वदर्शन जाहीर केलें. पुष्कळ वेळेला एखादी कल्पना, एखादें पुस्तक, एखादी तत्वप्रणाली नीट लक्षांत न झाली किंवा न आवडली तर लोक तिला हातावेगळी करतात, भिरकावून देतात. पण आइन्स्टिनची तत्त्वप्रणालि समजत नसतांहि लोक आइन्स्टिनला चिकटून बसले. पहिल्या प्रथम ज्यावेळीं त्याच्या विचारांचा सारांश प्रसिद्ध करण्यांत आला; त्याचवेळीं त्यांचें छायाचित्र पण प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यांचे विचार वाचण्याऐवजी लोक छायाचित्राकडे टकमक बघत राहिले. चित्राकडे बघूनच त्यांना विचारांचें दर्शन घडूं लागलें. लोकांचीं मनें बदलूं लागलीं. त्यांच्या दृष्टींतून कसला तरी प्रकाश निघत आहे असें त्यांना वाटलें. त्यांच्या भुवया, त्यांचे केश, कांहीतरी गुजगोष्टी करीत आहेत असें वाटलें. त्या चेहऱ्यांत समाधीभाव नव्हते. आत्मप्रौढीहि नव्हती; एकांतिकपणा नव्हता, पण तो चेहरा कांहीतरी दिव्य कहाणी सांगत आहे, कांहीतरी भव्यतेचा संदेश देत आहे, जगाच्या आणि आपल्या मुळांतच हात घालून त्याला हलवीत आहे असा अनुभव देऊं लागला.

हल्लीच्या युगांत सारखे चेहरे पहाण्याची आपणांस सवय झाली आहे. केसांची ठेवण, चेहरेपट्टीची निगा, कपड्यालत्यांची टापटीप, या सगळ्या गोष्टींतून बुद्धिमता, विद्वत्ता, अविकार, वैभव या सगळ्या गोष्टींचें दर्शन व्हावें अशी लोक-रहाणी दिसते. अशा रहाणींत क्षितिजापलीकडे, दूरदूर, अव्यक्तांत कांहीतरी टक लावून बघत असलेला स्वप्नाळू चेहरा क्वचितच पहावयास मिळतो. नाही म्हटलें तरी कलामंदिरांत, चित्रमंदिरांत किंवा वस्तुसंग्रहालयांत असों महान चित्रें संग्रहीत केलेलीं दिसतात. पण प्रत्यक्षांत ? फक्त एक आइन्स्टिनचाच चेहरा असा,—आइन्स्टिन द्रष्टा आहे, याबद्दल मन निःशंक होतें, चेहऱ्याचा प्रभाव सरळ हृदयावर पडतो. अबोल भाव जागृत होतात आणि जीवन प्रकाशित होतें.

मागचें महायुद्ध किती भयंकर होतें, या आपत्तींतून मानव जिवंत राहूं शकेल असें वाटेनासें झालें. सर्वत्र निराशा, काळोख, अशा परिस्थितींत आशेचा किरण दाखविणारा महान ऋषि या दृष्टीने आइन्स्टिनकडे लोक बघूं लागले. पाशवी शक्ती, रक्ताच्या नद्या आणि मृत्यूचें थैमान या गोष्टी क्षणभंगुर आहेत. जगांत व्यवस्था, नीतिनियम, सुविचार आणि सदाचार यांचें सामर्थ्य आणि वैभव हें कायमचें राहील असें सांगणारा आणि मानवी हृदयांत आशेची प्रेरणा करणारा महान ऋषि या दृष्टीने लोक आइन्स्टिनकडे पाहूं लागले. भविष्यकाळाच्या अज्ञात प्रांतांतून वास्तविकतेचा, सत्याचा संदेश जाणणारा आणि सांगणारा हा महापुरुष सर्वांस जीवनाधार वाटूं लागला. त्यांनी काय लिहिलें, काय सांगितलें, कोणता संदेश दिला या बाबतींत पूर्ण समज नसतांना देखील; किंबहुना बरेंचसें अज्ञानच असतांनासुद्धा हा महपुरुष जीवनाची, सुखी जीवनाची, दिव्य जीवनाची कला दाखवीत आहे, असा मानवी हृदयास साक्षात्कार होऊं लागला. कां बरें असें घडत होतें ? याचें एकच उत्तर आहे. "बोले तैसा चाले, त्याचीं वन्दावीं पाउलें" ह्याचें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रत्यन्तर आइन्स्टिनच्या जीवनांत आलें. त्याच्या दिसण्यांत, बोलण्यांत आणि वागण्यांत ऐक्याची प्रचीति येत होती. आन्तरबाह्य एकच रसाळपणा, निर्मळपणा अनुभवास येत होता. आंतील महात्म्य बाहेर सदासर्वदा खुलून दिसत होतें. जगांत अनेक महापुरुष होऊन गेले पण क्षुद्र स्वार्थामुळे अनेक लोक मातींत मिसळूनहि गेले. अनेकांनी आपल्या मोठेपणाचा दुरुपयोगहि केला, अनेक लोक अनेक मोहांना बळी पडले; पण हा महापुरुष आमरण क्षुद्रता, स्वार्थ आणि मोह यांच्या उरावर तांडवनृत्य करीत राहिला.

अनेक आत्मनिष्ठ माणसें आपल्या विचाराच्या चाकोरींत राहून स्वतःच्या पलीकडील जगाचा फारसा विचार करीत नाहीत. महान विचारांत जगतात, महान विचाराकरितां आयुष्य खर्ची घालतात, पण आपली तंद्री सोडून व केंद्र सोडून जगाच्या कल्याणाकरिता, दुःख निवारण्याकरिता धावून जाणारे विरळेच. आइन्स्टिन हे आत्मनिष्ठ होतेच, पण त्यांची निष्ठा जगाच्या कल्याणावर अधिष्ठित होती. त्यांचें सूत्र असें, 'मनुष्याला हा जो मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे तो मनुष्याचें कल्याण करण्याकरिताच. 'Man is here for the sake of other men only.' त्याचा परिणाम असा दिसला की ते आपल्या शास्त्रीय विचारांना थोडा वेळ बाजूला सारून मानवावर महायुद्धाचें संकट आलें असतां मानवाचे हक्क रक्षणाकरिता, सद्विचारांच्या मूल्याच्या रक्षणाकरिता, आणि जें जें म्हणून जगांत कल्याणकारी असेल त्यांच्या संरक्षणाकरितां कंबर बांधून, अन्यायाविरुद्ध दंड थोपटून राक्षसी महत्वाकांक्षेच्या विरुद्ध आरोळी ठोकून उभे राहिले. ते नुसतेच आत्मकेंद्रित शास्त्रज्ञ नसून मानवतेचे पुजारी आहेत, मानवतेचे सेवक आहेत, असेंहि सिद्ध झालें. त्यांच्या जीवनांतील या दयाधर्माचा प्रभाव मानवजातीवर फार हितपरिणामी झाला. त्यांचें शास्त्रीय विधान जरी लोकांना कळलें नाही, तरीहि त्यांच्या चांगुलपणाचा ठसा मानवी हृदयावर कायमचा कोरला गेला. त्यांच्या जीवनांतील लहान सहान गोष्टी समजून घेण्याची उत्कटता वाढली. त्यांच्या जीवनांत गुप्त असें कांहीच नव्हतें. मानापमानाची किंवा सम्पत्तीची अपेक्षा नव्हती. त्यांचें प्रत्येक आचरण बोलकें होतें.

वायुमापक यंत्रें जशीं अदृश्य शक्तींचे परिणाम ग्रहण करतात आणि मग माप व्यवस्थित दाखवितात, त्याचप्रमाणे जगहि अशा महापुरुषांच्या आचरणाचें मोजमाप ग्रहण करीत असतें. त्यामुळे ते बोलतात काय, ते लिहितात काय, यापेक्षा ते वागतात कसे ह्याच्याकडे जगाचें लक्ष्य असतें; आणि जेव्हा त्यांच्या महान तत्त्वदर्शनाबरोबर त्यांच्या जीवनांत अतीव नम्रता, पराकोटीची उदारता, मानव समाजाला आपल्या पातळीइतपत उच्च नेण्याची शक्ति पाहातात, तेव्हा न कळतच मानवी हृदय अशा महात्म्यांचें पूजक बनतें. त्याचे कर जुळतात आणि मस्तक नम्र होतें. आइन्स्टिनच्या प्रत्येक कृत्यांत अध्यात्मिक शक्तीचा प्रादुर्भाव होतो असें मानवजातीच्या प्रत्ययास आलें. त्यांना जी कीर्ति लाभली त्याचें रहस्य त्यांच्या अध्मात्मशक्तींत आहे असें वाटूं लागतें. म्हणजे त्यांच्या शास्त्रीय लिखाणापेक्षा त्यांच्या अध्यात्मिक जीवनाचा, शीलाचा मनुष्य जातीवर अधिक प्रभाव पडला. हा महापुरुष एकदा डोळे भरून पाहावा असें सर्वांस वाटूं लागलें. तरीपण सामान्य जनतेला त्यांची तत्त्वप्रणाली जशी कळली नाही तसेंच ही अलम दुनिया नम्रत्व धारण करून त्यांना कां पुजूं लागली हें आइन्स्टिनला कळत नाही. असाच एक प्रसंग पॅरिसमध्ये घडून आला. बारा शास्त्रज्ञांचा सन्मान होण्याचा तो प्रसंग होता. प्रत्येकाची कीर्ति जनांत पसरलेली होती. त्या बारा शास्त्रज्ञांत आइन्स्टिनही एक होते. अनेक विश्वविद्यालयें आणि शास्त्रीय विद्यालयांनी आइन्स्टिनचा जितका मान करावयाचा तो त्यांनी केला होता. अधिक कांहीहि घडण्यासारखें नव्हतें. फार झालें तर हा एक शेवटचा सन्मानाचा प्रसंग होता असें म्हणा. हे बारा शास्त्रज्ञ बारा देशांतून आलेले होते. ज्या थिएटरमध्ये बसण्याची व्यवस्था केली होती तिथे अलोट गर्दी जमली होती त्या गर्दीचें मुख्य कारण म्हणजे आइन्स्टिनची उपस्थिति. ह्या समारंभाला ते जातीनें हजर राहणार आहेत ही बातमी झंझावाताप्रमाणें पसरली होती. अत्यंत शांततेंत एकएक शास्त्रज्ञ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपापला सन्मान स्वीकारीत होता. प्रत्येक वेळीं रीतसर टाळयांचा गजर होत होता. आणि क्षणार्धांत थांबत होता. असें अकरावेळ झाल्यानंतर मग आइन्स्टिन उभे राहिले. त्यांचा नित्याचा ओवडधोवड पेहराव, फाटके तुटके बूट, आणि पिंजारलेले केस असा थाट होता. पण जो टाळयांचा कडकडाट झाला त्याला मेघांच्या गडगडाटाचीच उपमा शोभेल. क्षणभर धरणीकंप तर होत नाहींना असें वाटूं लागलें. सर्वत्र एक प्रकारचा दिव्य प्रकाश पसरला. जेव्हा, जेव्हा, जेथे जेथे आइन्स्टिन उभे राहात तेथे तेथे असाच प्रकाश राही. थोडया वेळाने समारंभ संपला, पण आइन्स्टिन आणि त्यांच्या साथीदारांना त्या थिएटरमधून बाहेर पडणें अशक्य झालें. कारण बाहेर आइन्स्टिनना पहाण्याकरिता मानवी सागरच लोटला होता. त्यांच्याबरोबर असलेले तेथील अधिकारी विचारमग्न झाले. आंत अगर बाहेर जमलेल्या जनतेला आइन्स्टिननी शास्त्रीय युगांत केलेल्या आविष्कारांची कांहीहि माहिती अगर कल्पना नाही, एवढी त्यांना खात्री होती. तरी पण हा जनसमुदाय त्यांच्या दर्शनाकरिता लोटला हें पाहून त्यांच्या मनांत प्रश्न उत्पन्न झाला, "ही कीर्ति आइन्स्टिनच्या पायाशीं कां लोळण घेते ?, त्यांनीच तो प्रश्न आइन्स्टिनला सहज विचारला आणि याच प्रसंगीं आइन्स्टिनहि सहज बोलले "मला हें कांही कळत नाही." किती नम्रता, स्वत:च्या जीवनाबद्दलची किती अनासक्ति, याचें हें निदर्शक आहे. या साधेपणाची एक मौज लक्षांत घेण्यासारखी आहे. ह्या समारंभाच्या दुसऱ्याच दिवशीं आइन्स्टिनच्या एका जवळच्या नातलगाच्या मनांत आलें की आपण आइन्स्टिनला खाजगी रीत्या भेटावें. ज्या हॉटेलमध्ये त्यांचें वास्तव्य होतें त्या हॉटेलला त्याने टेलिफोन केला. नातलग म्हणाला, "मला प्रो. अल्बर्ट आइन्स्टिनशीं बोलायचें आहे." फोनवरून उत्तर आलें की इथे प्रो. अल्बर्ट आइन्स्टिन नांवाचे कुणी गृहस्थच नाहीत. "नाहीत कसे ? अहो मीच त्यांना काल तिथे रात्रीं पोचवून आलों." पुन्हा हॉटेलचे अधिकारी म्हणाले, "अहो तुम्ही शास्त्रज्ञ आइन्स्टिनबद्दल चौकशी करताना ? मग ते इथे खरोखर नाहीत. आपली कांहीतरी चूक होत असली पाहिजे. तसं म्हटल्यास आमच्या इथे एक आइन्स्टिन नांवाचे गृहस्थ आले आहेत; आणि ते मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों की, एक प्रवासी किंवा विक्रेते आहेत."—युनिव्हर्सिटीचा सन्मान स्वीकारीत असतां त्यांच्या पोशाखाचें जें वर वर्णन केलें आहे त्यावरून ह्या हॉटेल मालकाची किंवा इतर कुणाची अशीच समजूत होणें शक्य आहे की ते प्रवासी–विक्रेते असावेत किंवा शहराच्या ठिकाणीं बाजारहाट करण्याकरिता आलेले शेतकरी असावेत. महनीय महानपणा आणि कमालीचा साधेपणा यांचें अलौकिक मिश्रण आइन्स्टिनच्या जीवनांत दिसत होतें, म्हणूनच आम्ही म्हणतों की ते कीर्तीच्याहि पलीकडे होते.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाडयाबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.
"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद–दक्षिण.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी व्याकरणांतील वर्णांचीं स्थानें

या. ल. मुळे

मराठी व्याकरणशास्त्रामध्ये अनेक गोष्टी संस्कृत व्याकरणापासून परंपरेनें चालत आल्या आहेत. त्यांतच वर्णांच्या स्थानांचीहि गणना होते. परंतु मराठीच्या पद्धतीस अनुसरून त्यांत इष्ट तो बदल करणें आवश्यक आहे. वर्णांच्या स्थानांची प्रचलित व्याख्या अशी:—

'वर्ण मुखाच्या ज्या भागापासून विशेषत: उच्चारिले जातात; त्या भागास, त्या त्या 'वर्णांचीं स्थानें' म्हणतात.'

अर्थात्, मुखाच्या ज्या भागापासून जो वर्ण विशेषत: उच्चारिला जातो तें त्या वर्णाचें स्थान होय; हें निर्विवाद आहे. त्या मानानें बघतां, 'इ, ई' हे **वर्ण 'च' वर्गाप्रमाणें 'तालव्य–स्थानांत' येत नसून, त्यांचें विशेषत: व वास्तविक स्थान 'कण्ठ्य' हेंच सिद्ध होतें. म्हणून तें तसें मानावयास प्रत्यवाय नाही.**

त्याचप्रमाणें '**स्पर्श वर्णांत**' 'क्' पासून 'म्' पर्यंतचीं व्यंजनें घेतलीं आहेत. परंतु यांत 'च्' वर्गांतील 'ञ्' वर्ण वसत नाही. कारण स्पर्श वर्णांत त्याचें वास्तविक स्थानच नाही. त्यांतील अनुनासिकाचा उच्चार वगळल्यास तो 'य' वर्णांत अंतर्भूत होतो. म्हणून 'य' वर्णाप्रमाणें 'ञ्' ह्यासही 'अंतस्थ–वर्णांतच' स्थान द्यावयास हवें. परंतु यामुळे 'वर्ण–व्यवस्थेंत' निष्कारण ढवळाढवळ होण्याचा संभव आहे. म्हणून 'क्' ते 'म्' पर्यंतच्या स्पर्श–वर्णांत 'ञ' ह्यासही केवळ अपवाद म्हणून स्थान दिल्यास हरकत नाही.' परंतु खरा वादग्रस्त मुद्दा पुढेंच आहे. तो म्हणजे 'क्' ते 'म्' च्या नंतरही स्पर्श–वर्णांत मोडणाऱ्या वर्णांसंबंधींचा आहे.

मराठींतील आजपर्यंतच्या सर्व व्याकरण–लेखकांनी ह्या स्पर्श–वर्णांसंबंधीं वास्तवतेपेक्षां पूर्व-पद्धतीस अधिक प्राधान्य दिलें आहे. याचें प्रत्यंतर पाहणें झाल्यास, यासंबंधीं श्री. मोने यांनी केलेलें स्पष्टीकरण पहा:

"क्' पासून 'म्' पर्यंतच्या ह्या (२५) व्यंजनांस 'स्पर्श–व्यंजनें' म्हणतात. बाकीच्यास स्थान–परत्वें जरी वरील गटांत सामील करतां येण्यासारखें आहे; तथापि तशी पद्धति नाही."

माझ्या मतें निदान व्याकरणशास्त्राच्या सूक्ष्म अभ्यासांत तरी पद्धति नसल्यासही ती नव्याने सुरू करावयास हवी. कारण वास्तवतेच्या व सुधारणेच्या दृष्टिकोनांतून पूर्वपद्धतींत नसलेल्या बऱ्याच गोष्टी नव्याने प्रचारांत येवून रूढ झाल्याचें आपण पाहतोंच आहों. तेव्हा या दृष्टीनेच वर्णांच्या 'विवृत्त, स्पर्श, अन्तस्थ व उष्म' ह्या स्थानासंबंधीहि प्रस्तुत विचार करणें अवश्य आहे:—

यांत पूर्व पद्धतिनुरूप–'य्, व्, र्, ल्' यांना 'अन्तस्थ वर्णांत' स्थान दिलें गेलें आहे. परंतु 'य्' आणि 'व्' हेच फक्त 'अन्तस्थांत' येतात. '**र् व ल्' यांना केव्हाही स्पर्श–वर्णांतच घेणें उक्त आहे.** 'ञ' सारखा धडधडीत 'अ–स्पर्श–वर्ण' 'स्पर्श–वर्णांत' वेधडक अंतर्भूत होतो, नी 'र् ल्' सारख्या स्पष्टत: दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या 'स्पर्श–वर्णांना' त्यांच्या वास्तविक स्थानापासून वंचित करून वर्ण मालेचा विवृत्त, स्पर्शादि क्रम कायम ठेवण्याकरितां वळेंच अंतस्थांत वेठीस धरणें केव्हाही योग्य ठरणार नाही. शिवाय, 'स्पर्श-वर्णांत' त्यांचें स्थान मानिल्यास,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वर्ण-माले' च्या क्रमांतही विशेष असा विवाड व वदल होत नाही. कारण एरव्हीहि या भेदास अनुसरून वर्ण–मालेच्या स्थानाप्रमाणें 'उष्ण-वर्णांतील' 'ह्' नंतर मराठीच्या वर्ण-क्रमास 'ळ्' वर्णानें वाध येतोच. कारण 'ह्' नंतर 'ळ्' हा शुद्ध मराठींतील वर्ण पुन्हा 'स्पर्श-वर्णांत' अंतर्भूत होतोच. तेव्हां पूर्व-पद्धतीवर विशेष न विसंवतां, 'ळ्' वर्णाप्रमाणेंच मराठी व्याकरणांत 'र् व ल्' यांना स्पर्श-वर्णांतच घ्यावयास हवें.

तसेंच स्वर-मालिकेंतील 'ऋ, ॠ, व लृ' ह्या वर्णांनाही 'विवृतांत' न घेतां स्पर्श-वर्णांतच घेणें योग्य आहे. असो.

अशा रीतीनें प्रचलित मराठी व्याकरणांतील 'वर्ण-विचारा' संबंधीं प्रस्तुत स्थलीं कांहीं विचार, वास्तव-प्रदर्शनास्तव सूज्ञ वाचकांसमोर मांडले आहेत.

खेळगडी—(मुलांचें मासिक) प्रकाशक के. भि. ढवळे. या जुन्या मासिकाचें नवें स्वरूप फार विलोभनीय आहे.

(१) भाऊवंदकीचें नाट्यवैभव, (२) मराठी रंगभूमीचें नाट्यवैभव—(किं अनुक्रमें रु.२ व रु. १. ले. शंकर नारायण तथा काका सहस्रबुद्धे, अमरावती.) दोन्ही पुस्तकें सचित्र असून त्या त्या विषयाचीं त्रोटक पण संपूर्ण माहिती देणारीं आहेत. दोन्ही पुस्तकांतून लेखकाचा त्या त्या विषयाचा अभ्यास व तळमळ व्यक्त होत आहे.

चरित्र आत्मचरित्र, तंत्र आणि इतिहास–(ले. प्रा. अ. म. जोशी, प्र. सुविचार प्र. मंडळ, नागपूर. पृ. २३२, मूल्य रु. ३.)

प्रस्तुत पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति असल्यामुळे त्यावर विस्तृत अभिप्रायाची गरज नाही. पूर्वीच्या व व आताच्या आवृत्तींत फरक एवढाच की श्री. माचवे यांनी लिहिलेला 'टीका' हा पहिल्या आवृत्तींतील मजकूर नव्या आवृत्तींत गाळला असून त्याऐवजी श्री. जोशी यांनी लिहिलेला 'मराठींतील चरित्रवाङ्मयाचा स्वतंत्रपणे लिहिलेला इतिहास' हा भाग घातला आहे. हा इतिहास अभ्यासकास फार उपयुक्त वाटेल यांत शंका नाही.

अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका:—(ले. गं. बा. सरदार, प्र. मॉडर्न बुक डेपो, बाजीराव रस्ता, पुणें २, मूल्य रु.६.) १९५७ सालीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचें हें १९५६ सालीं झालेलें केवळ पुनर्मुद्रण आहे. त्यामुळे त्यावर विस्तृत अभिप्रायाची गरज उरली नाही. दुसऱ्या आवृत्तींतील प्रस्तावना मात्र नवी असून त्यांतील 'त्यावेळचा मी जणू काय आज मलाच दुरावल्यासारखा झाला आहे. म्हणून या ग्रंथाचें संस्करण करण्याचा मी आता प्रयत्न करणें हें दुसऱ्याच्या लेखनांत अनधिकृपणे हस्तक्षेप करण्याइतकेंच अप्रयोजकपणाचें होईल असें वाटतें.' हें विधान चित्य आहे. प्रत्येक अवस्थेंत मनुष्य तेवढ्यापुरता पूर्ण आणि स्वतंत्र असतो असें मानल्यास प्रगति होणें कठीण होईल. असो.

१८०० ते १८७४ या काळांत झालेल्या सर्व क्षेत्रांतील मराठी वाङ्मयाचा परामर्ष लेखकांनी मोठ्या साक्षेपानें घेतला असून आवश्यक उतारे मधून मधून दिल्यामुळे तो रोचकहि उतरला आहे. याच विषयावर म. म. द. वा. पोतदार यांचें एक पुस्तक (मराठी गद्याचा इंग्रजी अवतार) प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या पूर्वी सुमारें १०–१२ वर्षें तरी अस्तित्वांत होतें. असें असूनहि तींत या पुस्तकाचा केवळ नामोल्लेखहि नव्हता. आता नव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत तसा तो केला आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

नष्ट होत जाणाऱ्या वाङ्मयाला संशतः पकडून ठेवणें अशा प्रकारच्या ग्रंथानेंच शक्य होतें. म्हणून या ग्रंथाचें विशेष महत्त्व आहे.

पां. कृ. सा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षण

समीक्षक प्रा. सुरेश म. डोळके

प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी यांनी संपादिलेला **'श्रीविवेकसिंधु,'*** श्री. गो. नी. दांडेकर यांची 'पूर्णामायचीं लेकरं' व श्री. वामन रावजी ढवळे यांचा कवितासंग्रह 'रेषा' या तीन मराठी ग्रंथांचं मी आज समीक्षण करणार आहें. पैकी पहिला ग्रंथ म्हणजे 'विवेकसिंधु'. विवेकसिंधु हा मराठींतला आद्य ग्रंथ आहे.

'शके अकराशें दाहोत्तरू । साधारण संवत्सरू
राजा शारंगधरू । राज्य करी ।।
ऐसा समयो सर्वोत्तमू । तेथ मुकुंद द्विजोत्तमू
विवेकसिंधू मनोरमू । निर्मिता जाला ।।'

या विवेकसिंधूंतल्या ओवीवरून शके १११० साधारण संवत्सरांत विवेकसिंधु ग्रंथ मुकुंद द्विजोत्तमाने निर्माण केला हें स्पष्ट होतें. पण, यासंबंधी विद्वानांत अनेक मतभेद आहेत. वरील ओवींत उल्लेखिलेल्या शकाचा व संवत्सराचा मेळ बसत नाही असें त्यांचें म्हणणें; व त्यामुळे शके १११० मध्ये विवेकसिंधु होणें शक्य नाही असें त्यांचें प्रतिपादन. प्रा. कुळकर्णी यांनी या दोनहि पक्षांचा समतोलपणें विचार करून शके १११० साधारण संवत्सर हाच 'विवेकसिंधू'चा रचनाकाल निश्चित केला आहे. साहजिकच, कालनिर्देशक उल्लेखावरून, तो मराठींतला आद्य ग्रंथ ठरतो.

कालाप्रमाणेच या आद्यकवीच्या स्थलासंबंधीहि विद्वानांत अटीतटीचे वादविवाद चालू आहेत. 'विवेकसिंधू'तल्या--

'वैनगंगेचे तीरीं । मनोहर अंबानगरी
तेथ प्रगटले श्रीहरी । जगदीश्वरू ।।

या ओवींत मुकुंदराजांनी उल्लेखिलेली 'मनोहर अंबानगरी' कोणती ? कांहींच्या मताने तें नागपूर–भंडाऱ्याची सीमारेषा असलेल्या वैनगंगेच्या काठचें 'अंभोर' होय, तर कांही तें मराठवाड्यांतल्या बाणगंगेच्या काठचें 'आंबेजोगाई' होय असें प्रतिपादन करतात. प्रा. कुळकर्णी यांनी याहि दोन मतांचा व्यापक व सखोल विचार करून वैनगंगेच्या काठचें अंभोर (मराठवाड्यांतलें आंबेजोगाई नव्हे) हेंच विवेकसिंधूचें रचनास्थल होय असा निर्णय दिला आहे.

प्रा. कुळकर्णी यांच्या या दोनहि निर्णयांनी मराठी आद्यकवीच्या बाबतींत बहुमोल कार्य केलें आहे. कारण असें, की या आद्यकवीचें स्थल व काल यांच्याच रिंगणाभोवती अनेक संशोधकांचें संशोधन आजवर रिंगण घालीत होतें. यासंबंधी अटीतटीचे वादविवाद होत होते. त्या वादविवादांत प्रांतीयतेचाहि रंग मिसळल्या जात होता. यापुढेहि हे प्रकार थांबतील असें नव्हे. पण, प्रा. कुळकर्णी यांच्यासारख्या मातवर व निःपक्षपाती संशोधकाने या बाबतींत व्यापक व सूक्ष्म विचार करून निर्णय दिल्यामुळे त्यांना एक आगळेंच महत्त्व प्राप्त झालें आहे यांत शंका नाही.

प्रा. कुळकर्णी यांच्या या विवेकसिंधूचें महत्त्व आणखी एका दृष्टीने वैशिष्टचपूर्ण आहे. कोणत्याहि कवीचा किंवा काव्याचा काल ग्रंथांतील केवळ कालनिर्देशक उल्लेखावरच विसंबून चालत नाही. त्यांतली भाषा, तत्त्वज्ञान, राजकीय – सामाजिक उल्लेख, त्यांतल्या वाक्यांची (काव्यग्रंथ असल्यास ओव्यांची) जडणघडण इत्यादि अंतर्बाह्य अशा अनेक गोष्टी

*प्रकाशक--श्री. ग. ल. ठोकळ, श्रीलेखनवाचन भांडार, लक्ष्मीरोड, पुणें २. पृष्ठसंख्या : ८७+५+४३१, किंमत बारा रुपये.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारांत घ्याव्या लागतात. विवेकसिंधूच्या भाषेचें तर इतकें अर्वाचिनीकरण झालें आहे, की त्यावरून विवेकसिंधु हा इतका, किंवा ज्ञानेश्वरीइतकाहि, प्राचीन ग्रंथ आहे हें कुणालाच खरें वाटूं नये !

प्रा. कुळकर्णी हे भाषाशास्त्राचे विख्यात तज्ज्ञ आहेत. त्यांनी भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनांतून प्रस्तुत आवृत्तीचें संपादन केलें आहे; आणि हेंच तिचें वैशिष्टय ! ज्ञानदेवांनी 'भावार्थदीपिका' लिहिल्यानंतर केवळ अडीचशें वर्षांच्या काळांतच तिच्यांत इतके अपपाठ घुसले की एकनाथांना—मराठीच्या त्या पहिल्या संशोधकाला भावार्थदीपिकेच्या अनेक प्रति जमवून तिचें पाठसंशोधन करावें लागलें. विवेकसिंधूच्या बाबतींतहि, विवेकसिंधूच्या रचनेनंतर सुमारें साडेसातशें वर्षांनी, प्रा. कुळकर्णी यांनी तेंच कार्य केलें आहे.

त्याकरिता त्यांनी विवेकसिंधूच्या सुमारें १०० हस्तलिखित व सर्व मुद्रित प्रति तपासल्या. त्या सर्वांतील पाठभेद पारखून व त्यांपैकी भाषेच्या व अर्थाच्या दृष्टीने प्राचीन, समर्पक व यथायोग्य असेच पाठ स्वीकारून प्रस्तुत प्रतीची मूळ संहिता त्यांनी निश्चित केली आहे. बाकीच्या प्रतींतील पाठभेद व जास्तीचा मजकूर त्यांनी, त्या त्या हस्तलिखित प्रतींच्या कालनिर्देशाप्रमाणे, संहितेच्या खाली पाठचिकित्सासाहित्य म्हणून नमूद केले आहेत. अशा रीतीने प्रस्तुत ग्रंथांतील संहितेला भाषाशास्त्र व पाठचिकित्साशास्त्र अशा दोनहि दृष्टींनी आदर्श करण्याचा त्यांनी कसून प्रयत्न केला आहे. अशा प्रकारच्या संपादनाने भाषेचे ऐतिहासिक व्याकरणहि सहजच सिद्ध होतें. कित्येक ठिकाणीं मात्र, प्रा० कुलकर्णी यांनी पाठभेदाच्या सदरांत जे पाठ नमूद केले आहेत, तेच नेमके पाठ त्यांनी मूळ संहितेंतहि स्वीकारलेले आहेत, अशा वेळीं तळटीपांत पाठभेद म्हणून मूळांत स्वीकारलेले पाठच नमूद करण्याची काय आवश्यकता होती हें कळत नाही. असो.

अशा संपादनाला भाषा व व्युत्पत्ति यांचें किती सूक्ष्म ज्ञान लागतें व अखंड परिश्रमांचीहि किती आवश्यकता असते याची कल्पना केवळ शब्दांनी देतां येणार नाही. प्रत्यक्ष मुकुंदराजांच्या काळचा विवेकसिंधू कसा असेल—त्यांतली भाषा, भाषेचीं रूपें, विभक्तीचे प्रत्यय, अव्ययें इ. कसे असतील याची कल्पना प्रा. कुळकर्णी यांच्या प्रस्तुत विवेकसिंधूवरून आल्याखेरीज राहत नाही. साडे सातशें वर्षांचा विशाल कालखंड मागे टाकून मुकुंदराजाच्या भाषेजवळ अभ्यासकांना नेण्याचा प्रयत्न कुळकर्ण्यांनी यांत केला आहे. प्राचीन मराठी भाषाशास्त्राचे अभ्यासक त्यांचें हें ऋण सदैव शिरावर धारण करतील.

मुकुंदराजांच्या समाधीबद्दल मात्र कुलकर्ण्यांनी अधिक विवेचन करावयास हवें होतें. सध्याच्या मध्यप्रदेशांतील बैतूलजवळील खेडला येथे एका पडक्या किल्ल्यांत मुकुंदराजांची समाधि दाखविण्यांत येते. ही समाधि कुणी बांधली, कधी बांधली, सुरुवातीपासून तिचें स्वरूप आजच्यासारखेंच आहे की त्यांत बदल केल्या गेला, इत्यादि दृष्टींनी या समाधीचें अधिक संशोधन व्हावयास हवें.

प्राचीन मराठी काव्याच्या संपादनग्रंथांत प्रा. कुळकर्णी यांचा प्रस्तुत 'विवेकसिंधु' भाषाशास्त्र व पाठचिकित्साशास्त्र या दृष्टींनी अप्रतिम आहे यांत शंका नाही. हा ग्रंथ प्रकाशित करून श्रीलेखनवाचन भांडाराचे श्री. ग. ल. ठोकळ यांनीहि प्राचीन मराठीची बहुमूल्य सेवा केली.

× × ×

आज ज्या दुसऱ्या ग्रंथाचं मी समीक्षण करणार आहें त्याचें नांव आहे **'पूर्णामायची लेकरं'*** मराठींतले ख्यातनाम कादंबरीकार श्री. गोपाल नीलकण्ठ दांडेकर यांनी वऱ्हाडच्या ग्रामीण जीवनावर लिहिलेली ही कादंबरी. मराठी कादंबरींतलें ग्रामीण जीवनाचें चित्रण समृद्ध आहे. मराठी कादंबरीकारांचे अग्रणी कै. हरिभाऊ आपटे हे प्रामुख्याने मध्यमवर्गाचे कादंबरीकार. तरीहि त्यांच्या सामाजिक व विशेषत: ऐतिहासिक कादंबऱ्यांत ग्रामीण जीवनाचीं—तियल्या व्यक्तींचीं व त्यांच्या हालचालींचीं जीं सूक्ष्म चित्रें

* प्रकाशक : प्र. वि. बेदरकर, महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती. मूल्य रुपये चार.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांनी समरसतेने रेखाटलीं आहेत तीं पाहून हरिभाऊंच्या विशाल प्रतिभेविषयीं मन जसें स्तिमित होतें, तसेंच त्या ग्रामीण वातावरणांत फेर-फटका करून मनाचें उद्‌बोधनहि होतें. दिघे यांची 'पाणकळा', 'आई आहे शेतांत!' ठोकळांची 'गावगुंड', के. नारखेडे यांची 'अंजनी' इत्यादि या क्षेत्रांतल्या प्रसिद्ध कादंबऱ्या. श्री. दांडेकरांच्या या कादंबरीने प्रस्तुत क्षेत्रांत स्पृहणीय व वैशिष्टयपूर्ण अशी मोलाची भर टाकली आहे.

वैशिष्टयपूर्ण म्हणण्याचें कारण असें, की दांडे-करांनी प्रस्तुत कादंबरी बव्हंशीं उपेक्षित अशा वऱ्हा-डच्या जीवनावर आधारली आहे. विदर्भ हा महारा-ष्ट्राचा सर्वांत समृद्ध पण सर्वांत उपेक्षित असा विभाग! विदर्भाची आठवण होतांच मनासमोर उभी ठाकते त्रिभुवनसुंदर दमयंती, त्यानंतर दर्शन होतें जगन्माता रुक्मिणीचें, त्यानंतर आठवतो महाकवि कालिदास अन् त्याचा विरही यक्ष, भवभूति अन् मराठीचा आदिकवि मुकुंदराज!

असा आहे विदर्भ—जगन्मातेचें माहेर, विरही जीवाचें विश्रांतिस्थान, प्रणयव्याकुल कन्येचें क्रीडास्थान आणि आदिकवींचें स्फूर्तिनिधान. साहजिकच तिथल्या जानपद भाषेंतहि माहेरचा गोडवा, विरहाची व्याकु-लता, प्रणयाची आर्तता आणि कर्तृत्वाचा आत्मविश्वास —हे सगळे भाव एकवटलेले आहेत. या भाषेंतच दांडे-करांनी प्रस्तुत कादंबरी लिहिली आहे.

पूर्णा ही वऱ्हाडांतली एक नदी. बावनगाव वऱ्हाडची तिच्यावर अपरंपार श्रद्धा! तिच्या काठावर राहणाऱ्या एका शेतकऱ्याच्या मंथर जीवनाची हो कहाणी. वयिराम हा या कादंबरीचा नायक. त्याला रूपा व मोकिंदा अशीं दोन मुलें असतात. म्हातारी आई असते. झोपाळू पत्नी असते. 'ठोकापिटी' नांवाचें त्याचें एक वावर असतें. ठोकापिटीची जमीन म्हणजे जसा कांही वर्फीचा थरच. तिथली माती डोळ्यांत घातली तरी खुपायची नाही, झोपलें तरी सलायची नाही. कुणाला अर्धशिशी उमळली तर त्या गावच्या मातीचा लेप करून खुशाल कपाळावर थापावा, की अर्ध्या घंटयांत वाऱ्यावर निघालाच तो!

ठोकापिटीच्या भरवशावर वयिरामला अनेक स्वप्नें पडत. पन्नास साठ खंडी जवारी आपण कचकावून घेऊं. जवारीचा भावहि चांगला आहे. कपा-शीलाहि चांगली किंमत... वयरमच्या जत्रेंत आपण एक नकशीदार छकडा घेऊं. त्याला कानकळाशीदार बैलजोडी जुंपूं. त्यांच्या पाठीवर ऐनेदार झूल. पायीं रखडणाऱ्या दुलेवां पिंजाऱ्याला आपण त्यांत आग्रहानें बसवूं. गावांतले सगळे लोक छकडयाकडे टकमक पाहत राहतील. दुल्लभचंद छकडा न्याहळीत अन् पोटावरल्या जानव्याशीं चाळा करीत विचारील,

'साधुबोवा, आपला हिशेव कव्हा करून टाकाल?'

'तुम्ही सांगसान् तव्हा!' असं म्हणत आपण छकडा पुढं काढूं.

दारासमोर कुणाचा छकडा थांवला हें पाह्यला मनकर्णा झोपेंतून उठून बाहेर येईल. आपल्याला पाहून पालू सरसा करून घरांत जाईल. ती जर जागी राहि-लीच तर लटक्या रागानं म्हणेल,' बैलजोडचा तितल्या घेजा! माही तांदुयपोत कहीची तुटली. तिच्यांतले मनी सांडले. थे दुरुस्त करनं तुमच्यानं होये ना!'

मग तिला समजावीत आपण म्हणूं,

'पुढल्या सालीं पाह्य ना! तुले पुतयाची माय करतो! आन् तुले अमरावतीले नेऊन तथून डागदारा-कडून तुह्या तोंडांत दात वसवून आनतो;'

अशीं नाना प्रकारचीं स्वप्नं त्याला पडत. पण दर वर्षी कोणतं ना कोणतं नक्षत्र त्याला दगा देई. कधी आर्द्रा, कधी चित्रा तर कधी हस्ताचा पूर्वार्ध. तो होईल तितकी मेहनतहि करी. पण मेहनतीपेक्षा दैवावर त्याचा अधिक विश्वास! गावांतले लोक त्याला 'साधुबुवा'च म्हणत.

मोठचा पहाटेस त्यानं वखरणीला आरंभ केला. अन् त्याच दिवशीं नंगेवावा गावांत आले. त्याचं वखरणं राहिलं; कारण त्याच्या ताफ्यानं नंगे बावा-समोर भजन केलं. त्या निमित्तानं धूर्त पांडेबोवानं त्याच्याकडून गावजेवण उकळलं. कर्ज आणावं लागलं दुल्लभचंदाकडून. जेवण देत नाही म्हटलं तर आलोका-वुढी—त्याची आई—मोठचानं गळा काढून रडली अन् म्हणाली 'मी चाललो पूर्नामायच्या डोहांत उडी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घाल्याले ! माह्या पोटी असा धोंडा निपजला !' खेटर मारल्यागत तोंड करून वयिरामाला जेवण द्यावं लागलंच.

रूपराव तर तालमीशिवाय गोष्टच करीत नसे. आणि मोकिंदा तर लहानच होता. नाक वाजवीत पेरकांडाची गाडी बनविण्याचं त्याचं वय !

एक वर्षी वयिरामला कापूस बरा झाला. तो विकून दुल्लभचंदाचं कर्ज द्यायचा त्यानं विचार केला. पण दुलेखाँच्या कुण्या दूरदूरच्या सग्यानं त्याच वर्षी व्यापार करायचं ठरवलं. दुलेखाँ मध्यस्थी पडला. वयिरामला नाही म्हणवेना. त्यानं उधारीच्या बोलीनं सारा कापूस त्याच्या हवाली केला. आणि नंतर एक दिवस त्या सग्यानं वयिरामाच्या पायांवर लोळकंडी घेत म्हटलं, 'पटेल, मेरा तो सत्यानाश हुया ? पैशेके पैशे गये ! सरभी फुटा ! चार जनोंका इस्वास था, सोभी गया !'

कापसाचे डोंगरच्या डोंगर अमरावतीला चालले होते. उफाडेदार बैल गळ्यांतल्या घुंगरा वाजवीत वऱ्हाडची श्रीमंती अमरावतीला वाहू वाहू नेत होते आणि डोईला पटका बांधलेले शेतकरी रुपयांनी कसन्या भरू भरू परत गावांत येत होते.

हातांतल्या चिलमीला छापी गुंडाळीत वयिराम हें सारें विमनस्कपणानें पाहत होता...

एकदा छोट्या मोकिंदाला घेऊन वयिराम रात्रीं ठोकापिटींत गेला. तिकडून येतांना मोकिंदाला आंबराईतल्या भुतानं झपाटलं. अंगारे धुपारे सुरू झाले. वयिरामच्या जत्रेला जाऊन बोकड मारायचं ठरलं. पुन्हा शंभर रुपयांचं कर्ज. वयिरामला कांही सुचेना. पण आलोकाबुढी खेकसली 'मोकिंदाले बावरांत नेताखेपी त्याहिले (लोकांना) पुसलऽ होतऽ काय त्वा ?'

वयिराम अगतिक होऊन ओरडला 'गोमाजीबोवा, आता तुम्हीच तारा, तुम्हीच मारा ! माहं घर, शेत अवघं घ्या ! पर मले या कवटायांतून मोकयऽ करजा !'

शेवटीं वयिरामला वेड लागायची पाळी आली. सर्वजण जत्रेला गेल्यावर तो हिंडत हिंडत पुर्णामायच्या काठावर गेला. तिथे एक साधू उतरला होता. त्याच्या चेल्यांत सामील होऊन तो परतवाड्याकडे निघाला..

इकडे दुल्लभचंद ठोकापिटीवर कबजा करतो. पण रूपानंहि ठोकापिटीचं अन्न खाल्लं असतं. तो दुल्लभचंदाच्या एकाहि जवानाला बावरांत पाय टाकूं देत नाही. 'घरच्या लक्ष्मिम्याहिचंऽ कुकू पुसून मंग बावरांत पाऊल घालजा !' असं त्यानं बजावतांच जवान दचकले. ठोकापिटीला रूपा वाचवतो.

तो साधू झालेल्या वयिरामलाहि शोधून आणतो. वेलोऱ्यांत सर्वांना आनंदी आनंद होतो आणि साऱ्या गावकऱ्यांनी केलेल्या सत्यनारायणाच्या पूजेंत कादंबरी संपते.

अशी आहे 'पूर्णामायचीं लेकरं.' तिच्यांत फराक फराक नस ओढणारी आलोकाबुढी जशी आहे, तसाच गुढघ्यावर धोतराची भक्कम गाठ बांधून वसणारा व अडकित्यानं सुपारी कातरणारा गोमाजी पाटील आहे, पेन्सिलीच्या टोकाला थुंकी लावून अमरावती जिल्ह्यांतल्या नव्या वहीवर निष्ठेनं उतरून घेणारा अमरत्या आहे, गंधाचा टिळा कपाळावर रेखून धूर्तपणानं बोलणारा लवाड पांडेबोवा आहे आणि गावागावाला आपल्या भजनीं लावणारा दिगंबर नंगाजी बाबाहि आहे.

'पिठूर चांदण्याखाली जसं वेलोरं आंघोळीला बसलं होतं' (पृ. ७२) 'सगळीं गव्हाळीचीं बावरं चुपूचुपू चांदणं पीत होतीं' (८५) 'माह्या सुनेच्या हातची तुरीची दाय, गरम भाकरी, दायींत हिरोती, जवसाचं तेल, इतलऽ असलऽ का जसा माहा बाबू बावन गाव वऱ्हाडचा राजाच होय' (१६०) अशासारख्या कितीतरी वाक्यांवरून दांडेकरांची जिव्हाळ्याची वर्णनशैली दिसते. समरसता हाच या कादंबरीचा प्राण आहे. श्री. दांडेकर ही कादंबरी लिहितांना वेलोऱ्याच्या जीवनाशीं पूर्णपणानं समरस झाल्यामुळेच त्यांना पूर्णामायच्या लेकराचं इतकं भावस्पर्शी आणि वास्तव जीवन रेखाटतां आलं. मराठी ग्रामीण कादंबऱ्यांत दांडेकरांची ही 'पूर्णामायचीं लेकरं' आपल्या वैशिष्ट्याने सदैव तळपत राहतील यांत शंका नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या कादंबरीचें आणखी एक वैशिष्टय असें, की तिच्यांत वऱ्हाडी बोलीचा दांडेकरांनी वापर केला असल्यामुळे वऱ्हाडीच्या भाषाशास्त्रीय अभ्यासकांनाहि वऱ्हाडीचा 'बोल'पट म्हणून तिचा उपयोग होईल. शिष्ट मराठीनें अव्हेरलेलीं कितीतरी शास्त्रीय व संस्कृतोत्पन्न रूपें व शब्द वऱ्हाडींत हरघडी वावरत असतात.

वऱ्हाडीप्रमाणेच नागपूरच्या आसपास खेड्या-पाड्यांत बोलल्या जाणाऱ्या नागपुरी ग्रामीण मराठी-लाहि कादंबऱ्यांत प्रमुख स्थान मिळालें पाहिजे अशी इच्छा व्यक्त करून 'पूर्णामायच्या लेकरां'चं हें समीक्षण आटोपतों.

× × ×

तिसऱ्या पुस्तकाचें नांव आहे–'रेषा'*. 'पारिजात', ज्योत्स्ना,' 'रागिणी', 'साहित्य' इत्यादि सुप्रसिद्ध माजी नियतकालिकांचे व 'महाराष्ट्र–साहित्य–पत्रिके'चे विख्यात संपादक श्री. वामन रावजी ढवळे यांचा हा स्फुट कवितासंग्रह. विद्यार्थीदशेपासूनच 'बालशाहीर' या टोपण नांवाने त्यांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला. इ. स. १९२७ ते १९४० या कालखंडांत त्यांनी वेळोवेळीं लिहिलेल्या कविता प्रस्तुत संग्रहांत संग्रहित करण्यांत आल्या आहेत.

अलिकडे मराठींत नवकाव्याचा एक नवीन प्रवाह निर्माण झाला आहे असें कांही टीकाकार म्हणतात. नवकाव्याचीं वैशिष्ट्यें मात्र ते कुठेच सांगत नाहीत. वैफल्य, निराशा, अगतिकता, आर्तता, दुर्बोधता किंबहुना, अरसिकताहि–हीं जर नवकवींचीं वैशिष्ट्यें असतील तर अशा गद्यप्राय, सौंदर्यविहीन आणि भावशून्य काव्याला 'नव'काव्य म्हणण्याचा अट्टाहास टीकाकार कां करतात हें कळत नाही. 'राजहंस' या गडकऱ्यांच्या कवितेंतल्या 'नवविधवा' यांतल्या 'नव' शब्दाची योजना तेव्हा चोखंदळ रसिकांना किती खटकली होती याची इथें आठवण झाल्यावाचून राहत नाही.

नवकाव्याच्या दुर्बोध व बेढब स्वरूपानें जे रसिक कंटाळून गेले असतील त्यांना श्री. ढवळे यांचा प्रस्तुत संग्रह निःसंशय दिलासा देईल.

'गातसे प्यार जे प्राणा–कवीचा हा असे वाणा
हास्य तें मुग्ध कलिकेचें–कवीचें काव्य नवलाचें'
(पृ. ९, ६२)

अशा बाण्याने, आणि अशा सौंदर्यदृष्टीनें कवीनें प्रस्तुत कवितांचें गायन केलें आहे.

फुललेला गुल्मोहर पाहतांच
'हिरव्या हिरव्या वनराजीवर
कुणी पसरिला वरतुनि शेंदुर
काय कुणी वेडा प्रणयाचीं स्वप्नें फुलवित.
वसला ?' (१२)

अशी कल्पना त्यांना सुचते. किंवा प्रेयसी येतांच तिच्या डोळ्यांतले अस्थिर भाव पाहून

'होते तुडुंब भरलें
मन तुझें भावनांनी
सारें गुपीत फोडिलें
मला तुझ्या लोचनांनी !' (२६)

असें तिच्या प्रियकराला वाटतें.

सौंदर्यदृष्टीप्रमाणेच राष्ट्रीय वृत्ति हाहि श्री. ढवळे यांच्या कवितेचा एक विशेष आहे, 'तो काल' (२०), 'छत्रपति शिवाजी' (३४) किंवा 'उन्नत हो हा भारत' (४४) या कवितांकडे या दृष्टींनी पहावें. 'शाहीर' या कवितेंत तर

'थाप डफावरती मारावी
पुन्हा तुणतुणीं हातीं घ्यावी
तरुण मंडळी अन् जमवावीं
रंगुनी जावें–महाराष्ट्र–पवाडे गावे' (४५)

असें ते स्पष्ट बजावतात.

निसर्ग आणि मानवता यांनाहि ढवळे यांच्या कवितेंत मानाचें स्थान आहे. सकाळीं उगवणारा सूर्य पाहून कनकाच्या तवकांत रत्नदीप उजळल्याचा किंवा कुणी देवदूत तेजाचा अभिषेक करीत असल्याचा त्यांना भास होतो.

'हलकेच फुलतो का
विश्व–पुष्पाचा हा कोश ? (४३)

---

* प्रकाशक : के. भि. ढवळे, कर्नाटक हाऊस, चिराबाजार, मुंबई २, मूल्य २ रुपये

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असेंहि त्यांना वाटतें. प्रीतिभावनेच्या विविध छटांचा विलास पाहायचा असेल तर 'वञ्चना' (२३), 'तुझ्या माझ्या प्रीतीचें' (३२) 'प्रतीक्षा'(३०) या कवितांवरून दृष्टि वळवावी. जगानें संकटांचे डोंगर उभारले तरीहि

'अंतरींचे दीप होते
सारखे ग तेजाळत
मार्ग अपुला त्यामुळे
झाला सखे प्रकाशित ?' (३२)

असें प्रेयसीला म्हणणाऱ्या प्रियकराची निष्ठा हृदय हलवून सोडते.

कलेच्या दृष्टीनें त्यांच्या 'भिकारी' या नाट्यकाव्याचा मुद्दाम उल्लेख करावयास हवा. त्यांतल्या

'जा जा नेउनि दे हा पैसा
दीन भिकारी तुला दत्तसा
नमस्कार कर दे मग पैसा' (३७)

असें वहिणीला म्हणणाऱ्या भावाची भावना किती हृद्य आहे !

श्री. ढवळे यांची कविता दुर्बोध किंवा रडवी नाही. तिच्यांत आशेच्या चंद्रज्योति पाजळल्या आहेत, भावनांचीं कारंजीं थुईथुई नाचत आहेत आणि मनोहर कल्पनांच्या तारकाहि चमचमत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याचें गायन करण्याकरिता तर या शाहिराची प्रतिभा सदैव आघाडीवर आहे. जीवनाचीं शाश्वत मूल्यें ती रसिकांना पटवून देत आहे— आणि हें सारें अशा नाजूक सौन्दर्यभावनेनें की रसिकांनी जणु त्यांच्या सुगंधी शब्दपुष्पांच्या मंद परिमलानें पुलकित होऊन जावें !

या 'रेषे'चें हें कमनीय सौन्दर्य पाहून श्री. ढवळे यांनी महाराष्ट्र वाङ्मयाच्या फलकावर अशा सुन्दर 'रेषा' पुन्हा ओढाव्या अशीच कुणाहि रसिकाची सदैव इच्छा राहील !

[नागपूर नभोवाणीवर 'आदान प्रदान' या सदरांत ता. २६–६–५७ रोजीं दिलेल्या हिंदी भाषणाचा मराठी अनुवाद, नागपूर नभोवाणीच्या सौजन्यानें.]

ग्रं थ स मा लो च न

सम्राट रघु

(लेखक–श्री. राजाराम शास्त्री नाटेकर, प्रकाशक–श्री. केशव भिकाजी ढवळे, श्रीधर प्रकाशन, कर्नाटक हाऊस, चिराबाजार, मुंबई २, मूल्य-एक रुपया. पृष्ठें ४४)

कविकुलगुरु कालिदासाच्या 'रघुवंश' या काव्याच्या आधारानें 'रघू'चें चरित्र श्री. नाटेकर यांनी १० ते १४ वर्षे वयांच्या वाचकांना सांगितलेलें आहे. पुस्तकांत, कथानकाच्या अनुषंगानें, मधून मधून, २४ एकरंगीच, पण सुरेख, रेखाचित्रें घातलीं आहेत. हीं चित्रें, पुस्तक वाचत असतांना डोळ्यांपुढे उभ्या राहाणाऱ्या 'रघू'च्या आयुष्याच्या चित्रपटास योग्य आकार देतात. मूळ संस्कृत संविधानकाचा लेखकानें केलेला 'अव्यापारेषु व्यापार' पुस्तकाच्या सौंदर्यांत भर घालणारा असाच झाला आहे. थोडक्यांत पुस्तक उत्कृष्ट व 'अवश्य वाचनीय'च नव्हे तर 'अवश्य संग्रहणीय' हि आहे.

—मुकुन्द

राजा शिवाजी–(लें० रियासतकार गो. स. सरदेसाई, पृ. डबल क्राऊन १०८, मूल्य २ रु., प्र. के. भि. ढवळे, मुंबई.)

रियासतकार सरदेसाई हे आता शंभरीच्या जवळ आलेले अतिवृद्ध इतिहासकार आणि संशोधक आहेत. त्यांनी या परिणतावस्थेंत बालवाचकांसाठी म्हणून श्री. शिवाजी महाराजांचें संक्षिप्त चरित्र लिहिलें आहे. तें चरित्र संक्षिप्त असलें तरी त्यांत सरदेसाई यांच्या समग्र अभ्यासाचें सार आलें आहे. या पुस्तकांत इतिहास आणि रोचकता यांचा अपूर्व संगम

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झाला असून शिवाजी महाराजांच्या विभूतिमत्त्वाचे सर्व पैलू वाचकांच्या मनावर ठसतील अशी एकंदर योजना आहे. छपाई आणि चित्रें यांनी मजकुराच्या चांगुलपणांत कलात्मक भर घातली आहे. सारांश, बालवाचकांच्या हातीं देण्याच्या दृष्टीने हें पुस्तक सर्वोत्कृष्ट झालें आहे.

रंगाचार्य व इतर लेख— (ले० कै० गोविंद सदाशिव टेंबे. प्रकाशक पु. रा. लेले C/o राष्ट्रवैभव प्रेस, मुंबई ४. मूल्य १ रु. १४ आणे, पृ. १०८.)

अलिकडे जशी राजकारण, साहित्य इत्यादि क्षेत्रांत थोर झालेल्या व्यक्तींनी आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत तशींच तीं कलाक्षेत्रांत प्रावीण्य मिळालेल्या व्यक्तींनीहि लिहिलीं आहेत. श्री. गणपतराव बोडस या उत्कृष्ट गद्य नटाचा 'माझी भूमिका' हा ग्रंथ अशाच पैकी आहे. या ग्रंथांत श्री. बोडस यांनी जीं विधानें केलीं तीं चुकीचींच नव्हे तर दुसऱ्यांना मानहानीकारक असल्याचें आढळून आल्यामुळे, त्या कालांतील तितकेच प्रसिद्ध नट कै. टेंबे यांनी त्या विधानांना उत्तरें देण्यासाठी लिहिलेले लेख या पुस्तकांत संग्रहीत केले आहेत. अर्थात् 'माझी भूमिका' या पुस्तकाची दुसरी बाजू प्रस्तुत रंगाचार्यांत आलेली असल्याने हें पुस्तक एक प्रकारें पूरक स्वरूपाचें झालें आहे. रंगभूमीच्या चलत्या काळांत नाटक मंडळींची व नटांची परस्पर स्पर्धा कशी चालत असे व कलेबरोबरच कलीचाहि रहिवास तेथे कसा होता याची साक्ष या पुस्तकावरून पटते. 'माझी भूमिका' किंवा 'रंगाचार्य' यांपैकी कोणत्या पुस्तकांतील पक्ष खरा हें पडताळून पाहावयाला आजच्या वाचकांजवळ कांही साधन नाही. शिवाय हें पुस्तक लेखकांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालें असल्यामुळे, त्याचा जाब विचारणेंहि अशक्य झालें आहे. तत्कालीन वाद समजून घेण्यासाठीच या पुस्तकाचा उपयोग असल्यामुळे साहित्यदृष्ट्या त्याचें स्वतंत्र मूल्य नाही हें उघड आहे.

चंद्रहास आख्यान (खंडकाव्य)—कवयित्री काव्यशारदा सौ. लक्ष्मीबाई नानासाहेब कुळकर्णी, दड्डीकर, पृ. ३०, मूल्य आठ आणे.)

चंद्रहासाचें पौराणिक आख्यान कवयित्रीनें श्लोकबद्ध रीतीने यांत मांडलें आहे. काव्याची ढब जुन्या पद्धतीची असून विविध वृत्तांची योजना केली आहे. रचना सामान्य आहे.

कल्हार (त्रैमासिक) (संपादक देशपांडे-देशमुख काप्रतवार, पो. देगलूर, जि. नांदेड) मराठवाड्यांत नवीनच निघालेल्या या त्रैमासिकाचा दुसरा अंक आमच्याकडे अभिप्रायार्थ आला आहे. हा अंक त्या विभागांतील साहित्यजागृति दर्शवीत असला तरी त्यांतील चुका पाहून मन विषण्ण होतें. या चुका केवळ छपाईच्या नाहीत, तर शुद्धलेखनाच्या अज्ञानाच्या आहेत. लेखांचा दर्जा मात्र बरा आहे.

साधना कुमार अंक. किं. १ रु. कै. साने गुरुजींच्या साधना मासिकाचा हा कुमार अंक फार वाचनीय आहे. साने गुरुजींचा मुलांवर फार लोभ म्हणून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ हा अंक मंडळाने काढला आहे. छपाई आणि अभिरुची दोन्ही चांगलीं आहेत.

ढवळे (मासिक)—सं. श्री. वा. ढवळे, वा. व रु. १०. या नव्या मासिकाने साहित्य क्षेत्रांत पदार्पण केलें असून आकर्षक चित्रें, विचारपूर्वक लेख आणि सुबक छपाई या वैशिष्ट्यांनी तें सर्वमान्य होईल यांत आम्हाला शंका नाही. 'सामान्य माणसाचें समाधान हेंच 'ढवळे' मासिकाचें ध्येय' असें आपलें बीद्र या मासिकाने जाहीर करून टाकलें आहे. प्रश्न एवढाच की सामान्य वाचकाची व्याख्या काय करावयाची व त्याचें सगुण स्वरूप कोठे पाहावयास मिळेल, हाच काय काय तो प्रश्न आहे! आम्ही या नूतन भावंडाचें स्वागत करतों व त्यास उत्कर्ष चिंतितों.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघ वार्ता

केंद्रवृत्त, नागपूर

प्रा. श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस, वि. सा. संघ, यांजकडून

दि. १४-७-१९५७ रोजीं सकाळीं ९ वाजतां कार्यकारी मंडळाची सभा झाली. त्या सभेंत खालील विषयांचा विचार करण्यांत आला.

कै. श्री. ना. ग. डवीर यांच्या निधनाबद्दल ठराव, 'क्रमिक पुस्तकें' समितीची नेमणूक, 'विशाल मुंबईराज्य' या ग्रंथाबद्दल ठराव, समितिप्रमुखांचा वाहनव्यय, कार्यालयीन सुटया, 'केदार ग्रंथ विषयक' समितीची नेमणूक, सभासदत्वाकरितां आलेल्या पत्रांचा विचार, प्रमाणपत्र वितरण समारंभ साजरा करण्याबद्दल विचार, 'गडकरी स्मारक ग्रंथालयाची योजना', सरकारी अनुदानाकरितां प्रयत्न करणें इत्यादि. पुढीलप्रमाणे समित्या नेमण्यांत आल्या.

क्रमिक पुस्तकें समिति—[विश्वविद्यालयीन व शालेय परीक्षांकरितां मराठी अभ्यासाची पुस्तकें तयार करण्याकरिता]

आमंत्रक : प्रा. भ. श्री. पंडित. सभासद : प्रा. पां. कृ. सावळापूरकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. वामनराव मोकासदार, श्री. दि. व. पंडित, अध्यक्ष आणि सरचिटणीस (पदसिद्ध सदस्य.)

डॉ. केदार ग्रंथ विषयक समिति

आमंत्रक : श्री. य. गो. मालोदे. सभासद : म. म. वा. वि. मिराशी, प्रा. पां कृ. सावळापूरकर, श्री. पां. बा. गडकरी, अध्यक्ष आणि सरचिटणीस (पदसिद्ध सदस्य.)

गडकरी स्मारक समिति व पुस्तकालय समिति

दि. ६-७-१९५७ रोजीं सायंकाळीं गडकरी स्मारक समिति व पुस्तकालय समिति यांची संयुक्त बैठक झाली. त्या बैठकींत 'गडकरी स्मारक ग्रंथालया'च्या योजनेसंबंधी विचार करण्यांत आला.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

दि. १४–७–१९५७ रोजीं सकाळीं ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम समितीची बैठक होऊन स्वातंत्र्य समर शताब्दि, खाडिलकर स्मृतिदिन, लोकमान्य टिळक जयंति इत्यादि विषयांचा विचार झाला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोकमान्य टिळक जयंति

दि. १८-७-१९५६ रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचे अध्यक्षतेखाली लो. टिळक जयंति साजरी करण्यांत आली. त्यावेळीं प्रमुख वक्ते न्यायाचार्य प्रा. द्रवीड यांचें 'लो. टिळक व म. गांधी यांच्या राजकारणाचीं मूल्यें' या विषयावर मार्मिक भाषण झालें. अध्यक्षांचें समारोपाचें भाषण होऊन प्रा. माणिक के. वैतुले यांनी व्याख्यात्यांचे आभार मानले. शेवटीं वंदेमातरम् होऊन हा कार्यक्रम संपला.

अमरावती शाखावृत्त

चालू वर्षाकरितां पदाधिकाऱ्यांची निवड

वि. सा. संघ अमरावती शाखेच्या कार्यकारी मंडळाची सभा, शाखेचे नवे अध्यक्ष प्रा. डॉ. माधव गोपाळ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली दि. ४-८-५७ रोजीं झाली व त्यांत पुढील पदाधिकारी निवडण्यांत आले.

उपाध्यक्ष—श्री. हरिहरराव देशपांडे,
कोषाध्यक्ष—श्री. श्री. स. पेंढारकर,
सरचिटणीस—श्री. शरच्चंद्र सिंह,
चिटणीस—श्रीमती शकुंतला दिवाणजी

तसेंच मागील सर्वसाधारण सभेंत निवडल्या गेलेल्या सभासदांचीं नांवें—सौ. नलिनीबाई केतकर, श्री. दे. गो. उदापुरे, श्री. मा. ग. दोडके, श्री. वासुदेवराव दीक्षित त्याचप्रमाणे केंद्रातर्फे नियुक्त म्हणून प्रा. कृ. व्यं. पेशकार व अध्यक्षांचे सभासद म्हणून श्री. माणिक कानेड यांचा समावेश करून घेण्यांत आला व शाखेच्या नियोजित रूपरेषा आखली गेली.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समिति वृत्त

केंद्राधिकाऱ्यांना सूचनाः—

(१) परीक्षा आरंभतिथींत बदलः—यंदा 'फ्ल्यू'च्या साथीमुळे ठिकठिकाणच्या संस्था जवळ जवळ पंधरवाडा ते एक महिना इतक्या उशीराने सुरू झाल्याने ऑगस्ट २४ व २५ ला होणाऱ्या परीक्षेसाठी संस्थांना मुलांची तयारी करण्यास पुरेसा अवकाश मिळत नाही. ही अडचण लक्षांत घेऊन, परीक्षार्थ्यांची सोय पहावी, यासाठी व शाळांना तयारी करण्यास थोडासा अवधि मिळावा, याहिसाठी 'परीक्षा समिति'तर्फे ऑगस्टमध्ये जाहीर केलेल्या तारखांना परीक्षा न घेतां त्या १५ दिवसांनी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यांत येत आहे; त्या तारखा पुढीलप्रमाणेः—

शनिवार–रविवार दि. ७ आणि ८ सप्टेंबर १९५७

(२) 'फ्ल्यू'च्या आजारामुळे सर्व ठिकाणच्या शाळा उशीरा सुरू झाल्या आहेत. हें लक्षांत घेऊन परीक्षार्थी–आवेदनपत्रें भरण्याची मुदत दि. १० ऑगस्ट ५७ पर्यंत वाढविण्यांत येत आहे. तसेंच सर्व केंद्राधिकाऱ्यांनी आपल्या केंद्रांतील आवेदनपत्रें मुदतीच्या आंत सशुल्क पाठवून परीक्षा समितीला साह्य करावें.

(३) केंद्राधिकारी पुरस्कार परस्पर कापून न घेतां संपूर्ण परीक्षाशुल्क एकत्रित एकदाच सरचिटणीसांकडे पाठवावे.

(४) जानेवारी ५७ मध्ये झालेल्या परीक्षेंत परीक्षेस न बसलेल्या परीक्षार्थ्यांना पुनश्च त्याच शुल्कांत या सत्रापासून परीक्षेस बसतां येणार नाही. केंद्राधिकाऱ्यांनी सुविधेचीं आवेदनपत्रें भरून पाठवूं नयेत. पाठविल्यास " 'सुविधा' आवेदनपत्रें " रद्द समजण्यांत येतील. सर्वांनी या वेळेपासून शुल्कांत आणि विनीत–पारंगतच्या अभ्यास क्रमांत झालेला बदल लक्षांत घेऊन परीक्षार्थ्यांकडून आवेदनपत्रें भरून घ्यावींत.

(५) परीक्षा समितीकडून यापुढे येणारें परीक्षाविषयक साहित्य तावडतोब तपासून पाहावें व कमी अधिकाची सूचना त्वरित कार्यालयास करावी.

(६) परीक्षा संपतांच पहिल्या डाकेने सर्व साहित्य व हिशेब कार्यालयाकडे रवाना करावे.

परीक्षार्थ्यांना सूचनाः—

(७) परीक्षार्थ्यांनी परीक्षा ८ दिवसावर आली असतांना आपापल्या केंद्राधिकाऱ्यांकडून **प्रवेशपत्रें** मिळवून स्थान व समयाची माहिती प्राप्त करून घ्यावी. कार्यालयाकडे यासंबंधी पत्रव्यवहार करूं नये.

नागपूर १
द. ३०–७–१९५७
वि. सा. संघ.

रा. पु. सगदेव,
संचालक, परीक्षा समिति.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Building Committee (Mandir Samiti) V. S. Sangh, Nagpur.

Receipts & Payments Statement for the period ending on 31-3-57.

Receipts		Payments	
Opening balance	0—0 0	Supervision charges	4,817—7-0
		Contingencies	1,054—3-6
Total withdrawals from Building fund Account	1,02,671-11-9	Architectural fees & Expenses	2,029—7-0
		Miscellaneous	70—8-0
Miscellaneous Receipts	187—8-0	Temp. Loan (of last years) refunded	11—9-9
		Building Materials	74,815-10-6
		Constructional labour charges	18,343-11-6
		Electrical Installation	345—9-6
		Plumberring & Sanitary fittings	916—9-0
			1,02,404-11-9
		Closing balance— Cash in hand	454—8-0
	1,02,859—3-9		1,02,859—3-9

Date 19-6-57

Examined & Found Correct
(Sd.) **Maheshwar Gadre & Co.**
Chartered Accountants

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✱ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका